दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
*(आष्टी) वर्धा *गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६ *वर्ष ४ थे *अंक २११ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

दोन लाख रुपयांसह चांदीचा ऐवज चोरी

सेलू : अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून दोन लाख रुपयांचा रोख रकमेसह दोन लाख १२ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना सेलू तालुक्यातील सिंदी (रेल्वे) येथील मातोश्री सिताबाई टालाटुले प्राथमिक शाळेच्या आवारातील घरामध्ये उघडकीस आली. याप्रकणी सिंदी (रेल्वे) पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

मिळालेल्या माहितीनुसार, अतुल टालाटुले (वय ६८) रा. नागपूर, ह.मु. सिंदी (रेल्वे) यांचे मातोश्री सिताबाई टालाटुले प्राथमिक शाळेच्या आवारात वडिलोपार्जीत घर आहे. येथील घर दुरूस्तीचे काम सुरू असल्याने त्यांनी दोन लाख रुपये आणून ठेवले होते. १० ऑगस्ट रोजी त्यांना सिंदी येथे येत असताना फोनवर घराच्या दारांचे कुलूप तुटलेले असल्याची माहिती मिळाली. त्यांनी घरी जावून बघितले असता दोन लाख रुपये, चांदीची मूर्ती, चांदीचा सिक्का आदी दोन लाख १२ हजार ५०० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे निदर्शनास आले. याप्रकणी सिंदी (रेल्वे) पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

भरती परीक्षा पद्धती सुधारणांसाठी राज्यात उच्चस्तरीय समिती : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पेपरफूट, परीक्षा गैरप्रकार रोखण्यासंदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू करणार

महसूल स्तरावर होणार विद्यार्थी संवाद २५ हजार सुरक्षित क्लासरूम उभारणार

मुंबई : महाराष्ट्रात विविध सेवाभरतीसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. वर्षा निवासस्थानी आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील उपस्थित होते, त्यांनीही विविध उपयुक्त सूचना बैठकीत केल्या.

ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव की. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरविण्यात येईल



अशी माहिती यावेळी देण्यात आली. अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणाऱ्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरूम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.



पाच टक्के राखीव निधी दिव्यांगांच्या कल्याणासाठीच खर्च करा : पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

वर्धा (जिमाका) : दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्याकडील एकूण निधीच्या पाच टक्के निधी निःसमर्थ अर्थात दिव्यांगांसाठी खर्च करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व स्थानिक संस्थांनी आपल्या क्षेत्रातील दिव्यांगांच्या कल्याणासाठी हा निधी खर्च करावा, असे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्र्यांनी दिव्यांगांसाठी राखीव निधीचा आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आ.सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रतिभा भागवतकर तसेच पाच टक्के दिव्यांग निधी जिल्हास्तरीय समितीचे अशासकीय सदस्य संजय जाधव, नरेंद्र नरोटे तसेच भोजराज पाटील, यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

दिव्यांग निधीतून योजना राबवितांना त्यांना रोजगाराचे साधन कसे उपलब्ध होईल, अशा प्रकारच्या योजना राबविण्यात याव्या. अस्थिव्यंग दिव्यांगांकडून स्कुटीची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे नोंदणीकृत आणि अत्यंत आवश्यक असलेल्या सर्व पात्र दिव्यांगांना स्कुटी देता येईल का? याबाबत नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले. यावेळी पालकमंत्र्यांनी अशासकीय सदस्यांकडून दिव्यांगांच्या अडचणी तसेच या प्रवर्गासाठी नाविण्यपूर्ण काय करता येईल, याबाबत जाणून घेतले. सुरुवातीस प्रतिभा भागवतकर यांनी

दिव्यांगांसाठी राखीव निधीचा पालकमंत्र्यांकडून आढावा

दिव्यांगांसाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. जिल्हा परिषदेच्या ५ टक्के निधीतून ईयत्ता १ ली ते १० वीच्या १३४ दिव्यांग विद्यार्थीनींना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे किसान विकास पत्र देण्यात आले. यावर ३३ लाख ५० हजार रुपयांचा खर्च करण्यात आला. अस्थिव्यंग प्रवर्गातील १२ दिव्यांग लाभार्थ्यांना १० लाख ५५ हजार रुपये खर्च करून पेट्रोलचलित स्कुटी देण्यात आल्या.

पंचायत समित्यांनी त्यांच्या ५ टक्के निधीतून ११ लाख ६३ हजार रुपये दिव्यांगांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवून खर्च केले. त्यात दिव्यांग लाभार्थ्यांना पिठगिरणीचे वाटप, दिव्यांग विद्यार्थ्यांना निर्वाहभत्त्याचा लाभ देण्यात आला. ग्रामपंचायतीनी त्यांच्या राखीव निधीतून १ कोटी ८४ लक्ष रुपये खर्च करून विविध उपक्रम राबविले. नगरपरिषदांनी विविध प्रकारच्या डीबीटी योजना राबविल्या. जिल्हा परिषदेच्यावतीने यावर्षी दिव्यांगांना धान्य साफ करण्याची मशिन पुरविणे, दिव्यांग बचतगटांसाठी विविध उपक्रम, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजनाचे नियोजन असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

दिव्यांग कल्याणासाठी जिल्हा नियोजनमध्ये राखीव एक टक्का निधीबाबत मार्गदर्शक सुचना, दिव्यांगांचे युडीआयडी कार्ड आधारलिंक करणे, दिव्यांगांकडून दाखल तक्रारींची दखल घेणे, शासकीय कार्यालयांमध्ये दिव्यांगांसाठी सुविधा सुविधा निर्माण करणे आदी विषय अशासकीय सदस्यांनी बैठकीत मांडले.

देवळी येथे आजपासून दोन दिवस महाआरोग्य शिबिर

पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते उद्घाटन समारोपाला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती



वर्धा (जिमाका) : पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत जिल्ह्यातील चौथे आणि शेवटचे महाआरोग्य शिबिर दिनांक १३ व १४ ऑगस्ट रोजी विदर्भ केसरी रामदासजी तडस, इनडोअर क्रीडा स्टेडीयम, देवळी येथे आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन दि.१३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता पालकमंत्र्यांच्याहस्ते तर समारोप दि.१४ ऑगस्ट रोजी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत होणार आहे

उद्घाटनप्रसंगी खासदार अमर काळे, आ.अभिजित वंजारी, आ.सुधाकर अडबाले, आ.अरुण लखानी, आ.समीर कुणावार, आ.राजेश बकाने, आ.सुमित वानखेडे, नगराध्यक्ष किरण ठाकरे, पुलगावच्या नगराध्यक्ष कविता ब्राम्हणकर, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण उपस्थित राहणार आहेत. दोन दिवस चालणाऱ्या या शिबिरात देवळी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना विविध आजारांचे मोफत निदान, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, औषधोपचार तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध होणार येणार आहे.

शिबिरामध्ये ज्येष्ठ नागरिकांची तपासणी, हृदयरोग तपासणी, मेंदूरोग तपासणी, ईसीजी, स्त्रीरोग, दंतरोग, अस्थिरोग, कर्करोग, त्वचारोग, कान-नाक-घसा, नेत्ररोग, बालरोग, पोटाचे विकार तसेच संसर्गजन्य रोगांची तपासणी करण्यात येणार आहे. याशिवाय रक्त तपासणी, मानसिक आरोग्य सल्ला, औषध वितरण, मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात येणार आहे. शिबिरात आयुष्मान भारत योजनेंतर्गत कार्ड नोंदणी व लाभार्थी सहाय्य केंद्रही कार्यरत राहणार आहे.

महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र तपासणी कक्षांची व्यवस्था करण्यात आली असून नोंदणीपासून उपचार व औषध वितरणापर्यंत सर्व सुविधा नियोजनबद्ध पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शिबिराच्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या तपासणीसाठी वेगवेगळी दालने राहणार आहे. शिबिरास येतांना नागरिकांनी आयुष्मान भारत कार्ड किंवा आधारकार्ड, रेशन व मोबाईल नंबर सोबत आणावा व शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

अल्पवयीन मुलीवरील अत्याचार, खून प्रकरणात न्यायालयात दोषारोपपत्र सादर

घटनेच्या २८ व्या दिवशी दोषारोपपत्र दाखल



वर्धा : अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व खून प्रकरणात न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले. घटनेच्या २८ व्या दिवशी पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

वर्ध्याजवळच्या एका गावात १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून निर्घृण हत्या केल्याचे प्रकरण १५ जुलै रोजी उघडकीस आले होते. या घटनेमुळे सर्वत्र संताप व्यक्त होत होता. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलीस ठाण्यात पोस्को तसेच विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यामध्ये राहुल राजू मडावी (वय ३०) याला पोलिसांनी अटक केली होती.

अतिशय गंभीर स्वरूपाचा हा गुन्हा असल्याने पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महादिक यांच्या नेतृत्वात दहा सदस्यीय विशेष तपास पथक तयार करण्यात आले होते. या संपूर्ण तपासावर अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांची दैनंदिन देखरेख अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. १२ ऑगस्ट रोजी या गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध सबळ पुरावा गोळा करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

- घटनेच्या निषेधार्थ बंद पाळून मोर्चा काढण्यात आला होता. पोलिसांनी आरोपीस अटक केली. पोलिसांनी दिवसरात्र काम करून तपास पूर्ण केला. त्यानंतर आरोपपत्र तयार करण्यात आले. आरोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले.

दहा हजार रुपये घेऊन गरज भागवत इमी मोबाईल ठेवून फसवणूक

वर्धा : दोन दिवसांकरिता अकरा रुपयांची मागणी करत त्याकरिता इमी मोबाईल ठेवत फसवणूक केल्याचा प्रकार आर्वी येथे पुढे आला. याप्रकणी आर्वी पोलिसांनी गन्हा दाखल केल्य. आर्वी येथील दशरथ जाधव हे २७ जुलै रोजी नेहमीप्रमाणे त्यांच्या कार्यालयात होते. त्यावेळी अमरावती पासिंग असलेल्या चारचाकी वाहनाने दोन इसम आले. कार कार्यालयासमोर उभी ठेवून कार्यालयात येत अमरवतीत्य लोचेद जायचे असल्याचे सांगत ११ हजार रुपयांची गरज असल्याचे सांगितले. त्याकरिता दोन दिवस मोबाईल ठेवतो, असे सांगत पैशांकरिता विनवणी केली.

पाच दिवसांचा कार्यसप्ताह लागू करण्याची मागणी बँक कर्मचाऱ्यांची निदर्शने



वर्धा : देशभरातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी २७ जानेवारी रोजी पाच दिवसांचा कार्यसप्ताह लागू करण्यासाठी संप केला होता. परंतु, केंद्र सरकारद्वारे सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या वतीने पाच दिवसांच्या कार्यसप्ताहाची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी निदर्शने करण्यात आले. वर्धामधे बँक कर्मचाऱ्यांद्वारे बँक ऑफ इंडिया झोनल ऑफिस आणि त्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा येथे नारेबाजी करत निदर्शने करण्यात आले.

केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या इंडियन बँक असोसिएशन आणि वित्तीय सेवा विभाग यांच्याकडून पाच दिवसीय कार्यसप्ताह लागू करण्यासाठी होत असलेल्या विलंबामुळे जोरदार निदर्शने करण्यात आले. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सात संघटनांचा समावेश असलेल्या यूएफबीयूने हा देशव्यापी निदर्शनांचा निर्णय घेतला.

बँकिंग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवर वाढता कामाचा ताण, तीव्र मनुष्यबळाची कमतरता आणि सतत ढासळणारा समतोल यामुळे कर्मचाऱ्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचं बँक संघटनांचा दावा आहे. अशा परिस्थितीत ग्राहक सेवेच्या गुणवत्तेवर तसेच बँकांच्या एकूण कार्यक्षमतेवरही विपरीत परिणाम होत असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले. या संपात विविध घटक संघटनांनी एकत्रितपणे सहभाग घेत सरकारकडे तातडीनं सकारात्मक निर्णय घेण्याची ठाम मागणी केली.

बँक संघटनांचे पदाधिकारी वैभव लहाने, निलेश वहाने, वैभव लोखंडे, कपिल झामरे, अनिल रत्नाडे, प्रणय भारती, सुमंत गिरडकर, मयुर भेलकर, यशवंत पांडे यांच्यासोबत वर्धातील २०० च्यावर बँक अधिकारी कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले.

शिक्षण विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे शिक्षिकेचा बळी?

ज्योत्स्ना नरांजे यांच्या मृत्यूप्रकरणी दोषींवर कारवाई करा; खासदार अमर काळेंची शालेय शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

वर्धा : हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिलेला असतानाही वर्धा जिल्ह्यात शाळांना सुट्टी न देणे आणि मुसळधार पावसाच्या परिस्थितीत शिक्षिकेला दुर्गम भागात प्रशिक्षणासाठी पाठविण्याचा निर्णय एका शिक्षिकेच्या जीवावर बेतला. ज्योत्स्ना नरांजे यांच्या दुर्दैवी मृत्यूने शिक्षण विभागाच्या नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी खासदार अमर शरदराव काळे यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

खासदार काळे यांनी शासनाला पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, मृत्यूच्या दिवशी वर्धा जिल्ह्यात हवामान विभागाचा ऑरेंज अलर्ट होता. इतर जिल्ह्यांमध्ये शाळांना सुट्टी देण्यात आली असतानाही वर्धा जिल्ह्यात शाळा सुरू ठेवण्यात आल्या. ज्योत्स्ना नरांजे यांनी सकाळी १०.३० वाजेपर्यंत शाळा घेतल्यानंतर हिंगणघाट तालुक्यातील चिचाळा येथे शैक्षणिक प्रशिक्षणासाठी प्रवास केला.

पावसाळ्याचे दिवस आणि प्रतिकूल हवामान असतानाही प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे हिंगणघाट येथे



प्रशिक्षणासाठी सुविधा उपलब्ध असताना सुमारे ६ किलोमीटर अंतरावरील चिचाळा येथेच प्रशिक्षण घेण्याचा निर्णय का घेण्यात आला?, असा सवाल खासदार काळे यांनी उपस्थित केला आहे.प्रशिक्षणासाठी जात असताना चिचाळा गावाजवळ मागून आलेल्या वाहनाने धडक दिल्याने ज्योत्स्ना नरांजे यांचा मृत्यू झाला. त्यामुळे हा केवळ अपघात नसून प्रशासकीय नियोजनातील हलगर्जीपणाचीही चौकशी होणे गरजेचे आहे, अशी भूमिका खासदार काळे यांनी मांडली आहे.

ऑरेंज अलर्टची माहिती असतानाही शाळा सुरू ठेवण्याचा निर्णय कोणी घेतला? प्रतिकूल हवामानात प्रशिक्षणाचे नियोजन कोणी केले? आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत?

या सर्व प्रश्नांची उत्तरे चौकशीतून मिळणे आवश्यक आहे.'प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे एका शिक्षिकेला नाहक जीव गमवावा लागला. भविष्यात अशा प्रकारे कोणत्याही शिक्षकाचा जीव जाऊ नये, यासाठी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी,' अशी मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे.

संपादकीय

नव्या पिढीसमोरील संधींचे विश्व



दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवक दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ युवकांचा गौरव करण्यासाठी नाही, तर त्यांच्या आकांक्षा, संघर्ष, संधी आणि भविष्याचा विचार करण्यासाठी आहे.

आजची युवा पिढी अत्यंत बुद्धिमान, जिज्ञासू आणि आत्मविश्वासपूर्ण आहे. तिच्या हातात ज्ञानाची अमर्याद साधने आहेत. जगभरातील माहिती क्षणात उपलब्ध होत आहे; मात्र माहितीचा महासागर असूनही योग्य दिशा, योग्य कौशल्ये आणि योग्य निर्णय यांची गरज पूर्वीपेक्षा अधिक वाढली आहे. त्यामुळे आजच्या युवकांसाठी सर्वात मोठे आव्हान म्हणजे बदलत्या काळाशी जुळवून घेत स्वतःचे वेगळेपण सिद्ध करणे. आजचा रोजगार बाजार झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक नोकऱ्या कमी होत आहेत, नव्या संधी निर्माण होत आहेत. केवळ पदवी मिळविणे पुरेसे राहिलेले नाही. उद्योगजगताला काम करणारे हात नकोत, तर विचार करणारे, समस्या सोडविणारे आणि नवनिर्मिती करणारे युवक हवेत. त्यामुळे शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष कामाचा अनुभव, संवादकौशल्य, नेतृत्वगुण, वेळेचे व्यवस्थापन आणि संघभावना यांना प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे.

पुढील पिढीसमोर एआय हे सर्वात मोठे आव्हान नसून सर्वात मोठी संधी आहे. पुनरावृत्तीची कामे यंत्रे करू लागली असली, तरी सर्जनशीलता, नेतृत्व, संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता आणि निर्णयक्षमता यांची गरज अधिक वाढत आहे. त्यामुळे नोकरीची सुरक्षितता पदवीवर नाही, तर सातत्याने नवीन कौशल्ये शिकण्यावर अवलंबून असेल. करिअर सुरक्षित ठेवण्यासाठी युवकांनी बदल स्वीकारणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेला प्रतिस्पर्धी नव्हे, तर सहकारी म्हणून वापरणे शिकले पाहिजे. आपल्या क्षेत्रातील आधुनिक साधनांचा प्रभावी उपयोग करणारे कर्मचारी अधिक मागणीत राहतील. त्याचबरोबर परकीय भाषांचे ज्ञान, विशेषतः जपानीसारख्या भाषांचे अध्ययन, जागतिक रोजगाराच्या संधी वाढवू शकते. प्रत्यक्ष कामाचा अनुभव, उद्योगांशी संपर्क, नवउद्योगांची मानसिकता आणि सातत्याने स्वतःला अद्ययावत ठेवण्याची सवय ही यशाची गुरुकिल्ली ठरेल.

उद्याचा रोजगार केवळ प्रमाणपत्रांवर मिळणार नाही, तर कौशल्य, नवकल्पना आणि शिकण्याची तयारी यांवर मिळेल. कृत्रिम बुद्धिमत्ता नोकऱ्या संपवत नाही, तर करिअरची नवी दारे उघडते. जे युवक बदलाशी जुळवून घेतील, आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करतील आणि मानवी मूल्यांसह काम करतील, तेच भविष्यातील जागतिक स्पर्धेत आघाडीवर राहतील.

उद्योजकता हे आजच्या युवकांसाठी आणखी एक मोठे क्षेत्र आहे. पूर्वी नोकरी मिळविणे हेच यशाचे मापदंड मानले जात होते. आज स्वतःचा उद्योग सुरू करून इतरांना रोजगार देणारे युवक समाजात नवा आदर्श निर्माण करीत आहेत. एखादी समस्या ओळखून तिचे नवे समाधान शोधणे, त्यातून सेवा किंवा उत्पादन निर्माण करणे आणि त्याचे व्यवसायात रूपांतर करणे हीच उद्योजकतेची खरी ताकद आहे. शासनाच्या विविध योजना, गुंतवणूकदारांची साथ आणि नव्या तंत्रज्ञानामुळे उद्योग सुरू करणे पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे; मात्र यासाठी चिकाटी, संयम, नियोजन आणि सातत्य या गुणांची जोड आवश्यक आहे. भविष्यातील रोजगाराचा पाया कौशल्यांवर उभा राहणार आहे. पुस्तकातील ज्ञान महत्त्वाचे आहेच; परंतु त्याचा प्रत्यक्ष वापर करता येणे अधिक महत्त्वाचे ठरत आहे. आज उद्योगांना समस्या समजून घेणारे, नवीन कल्पना मांडणारे, जलद शिकणारे आणि बदल स्वीकारणारे युवक हवे आहेत. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या शिक्षणासोबत एखादे व्यावसायिक कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. परकीय भाषांचे ज्ञान ही आजच्या काळातील मोठी ताकद ठरत आहे. जगातील अनेक देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. अशावेळी त्या देशांची भाषा अवगत असल्यास रोजगाराच्या संधी अनेकपटीने वाढतात. जपानने भारतीय युवकांसाठी आपले दरवाजे मोठ्या प्रमाणावर खुले केले आहेत. मात्र त्यासाठी जपानी भाषा, शिस्त, वेळेचे काटेकोर पालन आणि गुणवत्तेबद्दलची बांधिलकी आत्मसात करावी लागेल. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृती आणि विश्वास यांच्यामधील पूल असते.

जगातील अनेक मोठ्या कंपन्यांनी भारतात आपली संशोधन केंद्रे, विकास केंद्रे आणि सेवा केंद्रे सुरू केली आहेत. येथे केवळ दैनंदिन कामे होत नाहीत, तर नव्या कल्पनांवर संशोधन, अत्याधुनिक उत्पादनांची निर्मिती आणि जागतिक स्तरावरील निर्णय प्रक्रियेतही भारतीय युवक सहभागी होत आहेत. त्यामुळे आता परदेशात जाणे हाच यशाचा एकमेव मार्ग राहिलेला नाही. योग्य कौशल्ये, भाषा आणि प्रामाणिक मेहनत असेल, तर भारतात राहूनही जागतिक स्तरावर काम करता येते. आजचा सजग, सक्षम आणि आत्मविश्वासी युवकच उद्याच्या विकसित भारताचा खरा शिल्पकार ठरणार आहे.

अवयव दान: आज काळाची गरज!

जागतिक अवयव दान दिन सप्ताह.

जागतिक अवयवदान दिन हा एक महत्त्वाचा जागतिक कार्यक्रम आहे जो यूएसए मध्ये १९५४ मध्ये झालेल्या पहिल्या जिवंत दात्याच्या अवयव प्रत्यारोपणाच्या स्मरणार्थ आहे. अवयवदान जनजागृती करण्यासाठी आणि अधिकाधिक लोकांना अवयवदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो.

जगभरात दरवर्षी १३ ऑगस्ट रोजी जागतिक अवयव दान दिन साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट आहे, लोकांमध्ये अवयव दानाबाबत जागरूकता वाढवणे आणि अवयव दानाच्या महत्त्वाबद्दल जनजागृती करणे. अनेक गंभीर आजारांमध्ये अवयव प्रत्यारोपण हेच एकमेव उपाय असतो. परंतु, अवयव दान करणाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे अनेक रुग्णांना वेळेवर अवयव मिळत नाहीत आणि त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. अवयव दानामुळे मरणोत्तरही एखाद्याचे जीवन उपयोगी ठरू शकते. एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर त्याचे हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुसं इत्यादी अवयव इतर गरजू रुग्णांसाठी वापरले जाऊ शकतात. एका अवयव दानाने आठ ते दहा जणांचे जीव वाचवले जाऊ शकतात.

आपल्या देशात आणि समाजात अवयव दानाबाबत अनेक गैरसमज आणि भीती आहेत. म्हणूनच, जागतिक अवयव दान दिनाचे उद्दिष्ट आहे या विषयावर खुली चर्चा घडवून आणणे, जनजागृती करणे, आणि जास्तीत जास्त लोकांना अवयव दानासाठी प्रोत्साहित करणे. अवयव दान हा एक परोपकारी आणि महान कार्य आहे, ज्यामुळे आपण इतरांना जीवनदान देऊ शकतो. जागतिक अवयवदान दिन हा एक महत्त्वाचा जागतिक कार्यक्रम आहे जो यूएसए मध्ये सन १९५४मध्ये झालेल्या काळातील मोठी ताकद ठरत आहे. जगातील अनेक देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. अशावेळी त्या देशांची भाषा अवगत असल्यास रोजगाराच्या संधी अनेकपटीने वाढतात. जपानने भारतीय युवकांसाठी आपले दरवाजे मोठ्या प्रमाणावर खुले केले आहेत. मात्र त्यासाठी जपानी भाषा, शिस्त, वेळेचे काटेकोर पालन आणि गुणवत्तेबद्दलची बांधिलकी आत्मसात करावी लागेल. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृती आणि विश्वास यांच्यामधील पूल असते.

ध्यानं परं कृतयुगे त्रेतायां ज्ञानमुच्यते।

द्वापारे यज्ञमेवाहुः दानमेव कलौयुगे।।

कृत युगात ध्यान, त्रेता युगात ज्ञान, द्वापार युगात यज्ञ आणि कलियुगात दान हे साधन असल्याचा उल्लेख कुर्म पुराणात आढळतो. कलियुगात दानाला महत्व दिले असल्याने भुदान, गोदान, संपत्तीचे दान, अन्नदान, वस्त्रदान, नेत्रदान, रक्तदान, किडणीदान, या स्वरूपाचे दान आवश्यक केल्याचे आढळून येते. पौराणिक कथांमध्ये दधिची ऋषींनी वृत्तसुराला मारण्यासाठी आपल्या अस्थींचे इंद्राला दान दिले होते, शिबी राजाने कबुतराचे प्राण वाचविण्यासाठी आपल्या अंगावरचे मासं दान दिले तर कर्णाने जन्मत:च शरीराचा एक भाग म्हणून लाभलेले कवच-कुंडले दान केले. अशा पौराणिक कथा ऐकल्यानंतर वाटतं की, पुराण काळापासुनच अवयव दानाची संकल्पना रूढ आहे. त्यावरूनच पुराण काळापासून भारतीय संस्कृतीत दानाचे अनन्यसाधारण महत्व असल्याचे लक्षात येते. ऑगस्ट २०१६पासून राज्यात अवयवदानाविषयी विविध उपक्रम राबवले जात आहेत. सर्वच माध्यमातून अवयवदान करण्याबाबत जनजागृती होत असून दिवसेंदिवस अवयवदानाच्या मोहिमेला समाजातून प्रतिसाद मिळत आहे. परंतु तो प्रत्यक्षात अंमलात आणणाऱ्यांची संख्या त्यामानाने कमी आहे. अवयवदान करणाऱ्या व्यक्तिंपेक्षा गरजू व्यक्तिंची यादी मोठी आहे. त्यामुळे अवयवदान करण्यासाठी प्रत्येकाने आपला सहभाग नोंदविणे आश्यक आहे. वैद्यकिय क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे अवयवदान करण्याची प्रक्रिया काही प्रमाणात सोपी झाली आहे.

अवयवदान हे दोन प्रकारे करता येते- १) जिवंतपणी करता येणारे अवयवदान आणि २) मरणोत्तर करण्यात येणारे अवयवदान. जिवंतपणी अवयवदान करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रादेशिक प्रत्यारोपण समन्वयक केंद्र या अधिकृत संस्थेची परवानगी असते. अवयवदानानंतर दात्याच्या प्रकृतीवर दुष्परिणाम होणार नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच ही परवानगी दिली जाते. त्यामुळे जिवंतपणी किडणी व यकृताचे काही प्रमाणात दान करता येते. तसेच रक्त हे देखील मानवी शरीराचा अविभाज्य भाग आहे. मानवी शरीराचे संतुलन राखण्यासाठी रक्ताची निर्मिती होत असते. त्यामुळे ठराविक कालावधीमध्ये रक्तदान करणे हे आरोग्यासाठी चांगले असल्याचे सांगण्यात येते. मृत्यूनंतर अवयवदान करण्यासाठी मृत्यू कोणत्या कारणाने झाला हे तपासले जाते. त्याअंतर्गत हृदय बंद पडून होणारा मृत्यू जसे वृद्धापकाळाने किंवा नैसर्गिक मृत्यू असतो. नैसर्गिक मृत्यूनंतर आपण फक्त नेत्रदान, त्वचादान आणि हृदयाच्या झडपा दान करू शकतो. मेंदू बंद पडून होणारा मृत्यू म्हणजे ज्याला ब्रेन डेथ संबोधले जाते. यामध्ये मेंदूला इजा झाल्याने माणसाचा मृत्यू होतो. अशा मृत्यूमध्ये माणसाचा फक्त मेंदू मृत पावलेला असला तरीही हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस हे सर्व अवयव चालू स्थितीत असल्याने त्यांचे दान करता येते.

मेंदूमृत व्यक्ती व कोमामध्ये गेलेली व्यक्ती यामध्ये बराचसा फरक आहे. कोमामध्ये असलेल्या व्यक्तिच्या मेंदूचे कार्य चालू असते आणि त्यामुळे कोमामध्ये गेलेली व्यक्ती शुद्धीवर येण्याची शक्यता असते. परंतु मेंदूमृत झालेली व्यक्ती कधीही परत जिवंत होऊ शकत नाही. म्हणून मेंदूमृत व्यक्ती मृत्यूसमयी दवाखान्यात आयसीयुमध्ये असेल व मृत्यूपूर्वी अवयवदान करण्याचे संबंधित व्यक्तीने जाहीर केले असेल तरच अवयवदान करता येऊ शकते. असे करण्यासाठी कमीत कमी चार डॉक्टरांच्या समितीने त्या व्यक्तीची तपासणी करून त्यास मेंदूमृत घोषित करणे कायद्याने बंधनकारक आहे. मृत्यूनंतर नेत्र, मेंदू, हृदय, त्वचा अशा विविध अवयवांचे दान करून एक व्यक्ति दोन-तीन व्यक्तिंच्या रूपाने जिवंत राहू शकते. श्रीलंकेसारखा छोटासा देश नेत्र निर्यातीत जगात पहिल्या स्थानावर आहे. अनेक देशात मृत व्यक्तिने मरण्याआधी आपले अवयवदान करून नये, असे स्पष्ट जाहीर केले असेल तरच त्या व्यक्तिचे अवयवदान केले जात नाही. अन्यथा प्रत्येक व्यक्तिची अवयवदानाला मान्यता आहे, असे मानून त्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात येते. आज अवयवदानाविषयी सर्वस्तरावर जनजागृती करणे आवश्यक झाले आहे. अवयवदानव देहदान या दोन्हींमध्ये फरक आहे. अवयवदान हे जिवंतपणी व मरणानंतरही करता येते. मृत्यूपश्चात करण्यात येणाऱ्या अवयवदानानंतर मृत शरीर हे नातेवाईकांच्या ताब्यात देताना ते व्यवस्थित प्रक्रिया करून दिले जाते. ज्यामुळे एखादा अवयव काढून घेतल्याच्या कोणत्याही खुणा दर्शनी भागावर दिसून येत नाहीत. त्यामुळे अवयवदान केल्यानंतर धार्मिक विधी करण्यासाठी कोणतीही अडचण येत नाही. अवयवदान करताना शरीरातील टत्राविक अवयवच दान केले जातात. परंतु देहदान हे फक्त मरणानंतरच एखाद्या वैद्यकीय महाविद्यालयात डॉक्टरांना मानवी शरीराच्या अभ्यास, प्रात्यक्षिक व संशोधन करण्यासाठी दिले जाते. देहादानानंतर असे मृत शरीर धार्मिक विधी करण्यासाठी नातेवाईकांकडे दिले जात नाही तर ते फक्त संशोधनासाठीच वापरले जाते.

कोणत्याही स्वरूपाचे दान असो ते गरजू व्यक्तिना केले तर त्याला अधिक महत्व प्राप्त होते. आपल्याकडील संपत्ती ही गरजूंना दान केल्यास ईश्वरभाव प्राप्त होतो, असे म्हणतात. त्याअनुषंगाने नाशवंत मानवी शरीर मातीत विलीन करण्यापेक्षा आपली देहरूपी संपत्ती मरणोत्तर दान केली तर अनेकांचे प्राण वाचविल्याचे पुण्य प्राप्त होईल. असे अवयवदान करणारा दाता मरणानंतरही जीवन जगतो असे म्हणता येईल. अवयव दान ही प्रक्रिया आहे जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःचा अवयव काढून दुसऱ्या व्यक्तीला प्रत्यारोपण करण्यास अधिकृत करते, कायदेशीररित्या, एकतर देणगीदार जिवंत असताना संमती, मृत्यूपूर्वी केलेल्या मृत देणगींसाठी कायदेशीर अधिकृततेद्वारे किंवा मृत देणगीसाठी. कायदेशीर नातेवाईकांच्या अधिकृततेद्वारे????

देणगी संशोधनासाठी असू शकते किंवा अधिक सामान्यपणे, निरोगी प्रत्यारोपण करण्यायोग्य अवयव आणि ऊती दुसऱ्या व्यक्तीमध्ये प्रत्यारोपित करण्यासाठी दान केले जाऊ शकतात. सामान्य प्रत्यारोपणामध्ये मूत्रपिंड, हृदय, यकृत, स्वादुपिंड, आतडे, फुफ्फुसे, हाडे, अस्थिमज्जा, त्वचा आणि कॉर्निया यांचा समावेश होतो. काही अवयव आणि ऊती जिवंत दात्यांद्वारे दान केल्या जाऊ शकतात, जसे की मूत्रपिंडाचा काही भाग, फुफ्फुसाचा काही भाग किंवा आतड्यांचा काही भाग, परंतु बहुतेक दान दात्याने केल्यानंतरच होतात. सन २०१९ साली स्पेनमध्ये प्रति दशलक्ष लोकसंख्येमध्ये ४६.९९ हा जगातील सर्वाधिक देणगीदार दर होता, त्यानंतर यूएस- ३६.८८ प्रति दशलक्ष, क्रोएशिया- ३४.६३ प्रति दशलक्ष, पोर्तुगाल- ३३.८प्रति दशलक्ष आणि फ्रान्स- ३३.२५ प्रति दशलक्ष देणगीदार दर उरविण्यात आला. दि.२फेब्रुवारी २०१९पर्यंत युनायटेड स्टेट्समध्ये १,२०,००० लोक जीवरक्षक अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत होते. यापैकी ७४,८९७ लोक रक्तदात्याच्या प्रतीक्षेत सक्रिय उमेदवार होते. अवयवदानाबाबतचे मत सकारात्मक असले तरी, जागतिक स्तरावर अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्यांच्या तुलनेत नोंदणीकृत दात्यांच्या संख्येत मोठी तफावत आहे. अवयव दात्यांची संख्या वाढवण्यासाठी, विशेषत: कमी लोकसंख्येमध्ये, सध्याच्या पद्धतींमध्ये ऑप्टिमाइझ केलेल्या सोशल नेटवर्क हस्तक्षेपांचा वापर करणे, सोशल मीडिया वापरकर्त्यांना लक्ष्य करण्यासाठी अवयव दानाबद्दल तयार केलेली शैक्षणिक सामग्री उपलब्ध करणे समाविष्ट आहे. अवयवदानाच्या महत्त्वाबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी १३ ऑगस्ट हा दिवस जागतिक अवयवदान दिन म्हणून पाळला जातो. कारण अवयवदान काळाची गरज भासू लागली आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय अवयवदान दिनाच्या सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व सुलेखन
-
श्री कृष्णकुमार
आनंदी - गोविंदा निकोडे गुरूजी.
श्रीगुरूदेव प्रार्थना
मंदिराजवळ, रामनगर वॉर्ड,
गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप-
९४२३७१४८८३.

रायगड जिल्ह्यातील ३९% शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण

महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकरी बांधवांना कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी आणि त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' ची अत्यंत प्रभावीपणे व पारदर्शक पद्धतीने अंमलबजावणी सुरू केली आहे. रायगड जिल्ह्यात या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत असून बहुतांश शेतकरी लाभार्थ्यांची प्रक्रिया गतीने पूर्ण केली जात आहे.

योजनेतील प्रमुख निकष व स्वरूप..

☐कर्जमुक्ती योजना:दि. ०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२५ दरम्यान वाटप केलेले अल्पमुदत पीककर्ज/पुनर्गठीत मध्यम मुदत कर्जातील दि. ३०/०९/२०२५ रोजी थकीत व दि. ३१/०३/२०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या हप्त्यांवर मुद्दल व व्याजासह कमाल रु. २.०० लाखांपर्यंत कर्जमाफी.

☐एकवेळ समझोता योजना (ठऊझ): थकीत रक्कम २ लाखांपेक्षा जास्त असल्यास, २ लाखांवरील उर्वरित रकमेची परतफेड केल्यावर शेतकऱ्याला रु. २.०० लाख योजनेचा लाभ मिळेल.

☐ प्रोत्साहनपर लाभ: सन २०२२-२३ ते २०२४-२५ या काळात नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना किमान रु. ५,००० ते कमाल रु. ५०,००० पर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जात आहे.

रायगड जिल्ह्यातील अंमलबजावणीची अद्ययावत आकडेवारीच

☐ पोर्टलवरील एकूण नोंदणी: रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ८९१४ व राष्ट्रीयकृत बँकांची ३७६८ मिळून एकूण १२६८२ शेतकरी खाती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहेत.

☐ पहिली यादी यादीः पहिल्या टप्पात प्राप्त ७३६७ खात्यांपैकी (अण्ण: २२७७ राष्ट्रीयकृतः५६९) आतापर्यंत २८४६ खात्यांचे (३९टक्के जास्त) आधार प्रमाणीकरण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे.

☐ शासनाकडून प्राप्त रक्कमः १८५९ शेतकऱ्यांसाठी रु. १०,९५,४३,०००/- ची रक्कम प्राप्त झाली असून रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यामध्ये रक्कम जमा करुन त्यांना बेबाकी प्रमाणपत्र दिले असून त्यांना नव्याने पिक कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

☐ इतर तपशीलः ॲग्रीस्टॅक क्रमांक नसलेले ४३८६, मयत खातेदार ५३७, आणि दुसऱ्या जिल्ह्यातील खातेदार १४४ आहेत.

प्रशासकीय नियंत्रण व पारदर्शक तक्रार निवारण..

☐ नियंत्रण समित्या : योजनेच्या योग्य समन्वयासाठी राज्य, विभाग व जिल्हा स्तरावर समित्या कार्यरत आहेत. रायगड जिल्ह्यात जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक, बँक व्यवस्थापक व एफ यांच्या नियंत्रणाखाली काम सुरू आहे.

☐ जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती (अध्य): मा. जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्राप्त १० तक्रारींपैकी ५ तक्रारीचे यशस्वी निवारण केले आहे.

☐ तालुकास्तरीय समिती (ऊध्य): तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या माध्यमातून आधार प्रमाणीकरणातील अडचणी सोडवल्या जात आहेत.

ङशेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन..ङ

योजनेच्या जलद लाभासाठी पात्र शेतकऱ्यांनी आपले नाव संबंधित बँक शाखा, सेवा संस्था किंवा ग्रामपंचायत कार्यालयातील यादीत तपासून घ्यावे. ज्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांनी तातडीने जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा 'सीएससी (एण्ण)' केंद्रावर जाऊन ॲग्रीस्टॅक / फार्मर आयडी नोंदणी व आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे, जेणेकरून अनुदानाची रक्कम थेट खात्यात वर्ग करणे सुलभ होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी मा.श्री. किशन जावळे, जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजय कुलकर्णी यांनी केले आहे.

जंतर-मंतर ते झारखंड



पेपरफुटी, परीक्षांतील गैरव्यवहार आणि बेरोजगारीने देशातील 'जेन झी'च्या संयमाचा बांध फुटला आहे. विद्यार्थ्यांच्या या असंतोषाला राजकीय रंग देण्याऐवजी सरकारने परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे.

स्पर्धा परीक्षांच्या वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांनंतर विद्यार्थ्यांमध्ये मोठा संताप प्रकटला. स्पर्धा परीक्षांमधील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराबद्दल सरकारला जाब विचारण्यासाठी विद्यार्थी रस्त्यावर आले. नीट परीक्षेच्या पेपर फुटीनंतर दिल्लीत जंतर-मंतरवर 'जेन झी'ने केलेल्या आंदोलनाने सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले. पाटणा, मुंबई, पुणे, देशातील विविध शहरांत जेन झी रस्त्यावर उतरले. दिल्लीत संसद भवनाकडे जाणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी निर्घृण लाठीमार केला. पॅलेट गनसमधून गोळीबार केला. धुमश्चक्रीत दगडफेक झाली. पोलिससह अडीचशे जखमी झाले. पाटण्यात विद्यार्थी आंदोलकांना पांगविण्यासाठी पोलिसांनी पाण्याचे फवारे मारले, लाठीमार केला व नंतर एके-४७ मधून गोळीबार केला. झारखंडची राजधानी रांची येथे जयपालसिंग मुंडा स्टेडियममध्ये विद्यार्थ्यांनी नऊ दिवस उपोषण, आंदोलन केले. परीक्षा व भरतीमधील घोटाळ्यांची चौकशी 'सीबीआय'कडे सोपवावी, या मागणीसाठी विधानसभेच्या दिशेने घुसण्या आंदोलकांवर पोलिसांनी अगोदर पाण्याचे फवारे मारले नंतर लाठीमार केला. देशभर पेपरफुटी, परीक्षांचे अवस्थापन, भ्रष्टाचार, गैरव्यवहार, याविषयी 'जेन झी'मध्ये असंतोष खदखदत आहे.

सरकार कुणाचेही असो, राज्यकर्त्यांनी केवळ गोड बोलून, कुणालाही सोडगार नाही, अशी आश्वासने देऊन, विकासाची स्वप्ने दाखवून किंवा उज्ज्वल भविष्याची मधाचे बोट लावून जेन झी शांत बसणार नाही. एक तर सध्याच्या परीक्षा व्यवस्थेविषयी जेन झीला उबग आला आहे. स्पर्धा परीक्षांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्या पक्षाचे सरकार असते, त्यांचे समोसोयर सर्वत्र नेमलेले असताना म्हणून व्यवस्था पोखरली जाते आहे. स्पर्धा परीक्षांसाठी अहोरात्र अभ्यास करून, भविष्याचा चुराडा होणार असेल, तर नव्या पिढीने विश्वास ठेवायचा तरी कोणावर? दोन दोन-चार चार पदव्या मिळवूनही नोकऱ्या मिळत नसतील, तर तरुण पिढीने जायचे कुठे?

दरवर्षी दोन कोटी रोजगाराची स्वप्ने दाखवली गेली. प्रत्यक्षात नोकऱ्या कमी होत आहेत. सरकारी नोकरीत भरती नाही, खासगीत नोकऱ्या कमी आहेत. जी भरती होते ती सर्व कंत्राटी पद्धतीने होते. कायमचीं सरकारी नोकरी हे तर दिवास्वप्न राहिले आहे. राज्याराज्यांत सुशिक्षित बेरोजगारांचीं फौज लक्षावधींच्या संख्येने सोशल मीडियावर आहोरात्र जागी आहे. नैराश्याने पछाडलेले जेन झीं व्यक्त होण्यासाठी शुरुवींच्या मोर्चाकडे धावताना दिसत आहे. देशातील जेन झीला कोणी वाली नाही, त्यांना समजावून घेणारे कोणी नाही. नेत्यांचीं भाषणे ऐकायची व त्यांना सुखावणाऱ्या घोषणा द्यायच्या यातून काहीं निर्माण होत नाहीं.जंतर-मंतरते झारखंड झालेल्या आंदोलनांचे सलाधारी व विरोधी पक्षांनी आक्रमक पद्धतीने राजकारण करण्याचा कसा प्रयत्न केला, हे सर्व देशाने पाहिले आहे. जेन झी आंदोलनाचा लाभ उठविण्यासाठी राजकीय पक्षांनी एकमेकांवर चिखलफेक कशी चालवली, हे गेल्या दोन महिन्यांत दिसून आले. आंदोलनानंतर परीक्षा रद्द झाल्या, काही जणांना अटक झाली, शिक्षण मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. विद्यार्थ्यांच्या पदरात काय पडले? गेल्या दहा वर्षांत १५२ स्पर्धात्मक परीक्षांचे पेपर फुटले, त्यात एकाला तरी शिक्षा झाली का? गेल्या दहा वर्षांत पेपर फुटीवरुन कोणी एकतरी जेलमध्ये गेलाय का? मग जंतर-मंतर किंवा रांचीमधील आंदोलनाने विद्यार्थ्यांच्याहातात काय पडणार आहे? दर्जेदार शिक्षण, पारदर्शक परीक्षा पद्धती आणि सुरक्षित नोकरी मिळणार असेल, तर जेन झीमधील खदखद वाढत जाईल आणि पोलिस व जेन झी यांच्यातील संघर्ष असाच चालू राहील.जंतर-मंतरवर कोणताही राजकीय पक्ष आपले झेंडे घेऊन सामील झाला नव्हता. कोणत्याही राजकीय पक्षांची संघटना आपले बॅनर्स घेऊन दिल्लीत आंदोलनात उतरली नव्हती. दिल्ली पोलिस व नीट परीक्षा हे दोघी केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात. म्हणून मोदी सरकार आंदोलकांचे टार्गेट होते. केंद्रीय शिक्षणमंत्री यांचा राजीनामा ही प्रमुख मागणी होती. लाठीमार व गोळीबारानंतर केंद्रीय गृहमंत्री हे राजकीय पक्षांचे हल्ल्याचे टार्गेट बनले. दिल्लीतील आंदोलनात भाजप बचावात्मक होती. तर काँग्रेस-आप आक्रमक दिसले. रांचीमधील आंदोलनात काँग्रेस बचावात्मक दिसली, तर भाजप आक्रमक दिसला. कारण, झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचा मुख्यमंत्री आहे व त्यांच्या सरकारला काँग्रेसचे समर्थन आहे. दिल्लीत जेन झीच्या मागणीनुसार शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला; पण विद्यार्थी आंदोलकांवर पोलिसांनागोळीबाराचे आदेश कोणी दिले, असा प्रश्न विचारून काँग्रेसने वातावरण तप्त ठेवले. तीन आठवडे संसदेचे कामकाज झाले नाही. झारखंडमध्ये हेमंत सोरेन सरकारने परीक्षा रद्द करण्यासह आंदोलकांच्या प्रमुख मागण्या मान्य केल्या; पण पेपरफुटीची व भरती घोटाळ्याची चौकशी 'सीबीआय'कडे सोपवावी, या मागणीकरून आंदोलनाची धार कायम ठेवण्याचा प्रयत्न झाला.

सोरेन सरकारने चौकशी 'सीआयडी'कडे दिली आहे; पण आंदोलकांचा त्यावर विश्वास नाही. सोरेन सरकार चौकशी 'सीबीआय'कडे म्हणजे केंद्राकडे सोपवायला तयार नाही, म्हणून तिथे पेच निर्माण झाला आहे. झारखंडच्या आंदोलनात भाजपचे कार्यकर्ते पक्षाचे झेंडे फेकून उघडपणे सहभागी झालेले दिसले. दिल्लीत जेन झीचा 'लोकं संसद' मोर्चा निघाला तेव्हा जे. पी. नड्डा व त्यांचे सहकारी अशा दोन केंद्रीय मंत्र्यांनी काँग्रेसचे जनता पार्टीच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी निमंत्रण दिले. रांचीत हेमंत सोरेन सरकारने आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी चार मंत्र्यांस जबाबदारी सोपवली होती. केंद्रात शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा झाला. रांचीत सन २०२३ व २०२५ च्या झारखंड पब्लिक सर्व्हिस कमिशन व झारखंड स्टाफ सिलेक्शन बोर्डाने घेतलेल्या परीक्षा रद्द करण्यात आल्या. तसेच, चौकशीचे काम 'ईडी' व 'सीआयडी'कडे सोपविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर्स, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNINO : MAHMAR/2022/82242

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आठवडा झाला तरी बेमुदत उपोषण सुरूच !

पालकमंत्र्यांनाही निवेदन सादर !



सातारा : विविध प्रलंबित मागण्यांवर कार्यवाही-झाली नसल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र निषेध आंदोलन, घोषणाबाजी व बेमुदत उपोषण आठवडा झाला तरी सुरूच आहे.पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांनाही निवेदन देऊन कार्यकर्त्यांनी चर्चा केली. प्रशासन फक्त भेटून गेले असून ठोस कार्यवाही केली नाही.

सार्वजनिक हिताच्या विविध प्रश्नांबाबत आम्ही वेळोवेळी निवेदने व पुरावे सादर करूनही आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.तेव्हा पुढील प्रकरणांवर तात्काळ निर्णय घेण्यासाठी उपोषण सुरू करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद आरोग्य विभागातील आरोग्य सहाय्यक अरुण गुरव यांच्यावरील तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून दोषीवर कारवाई करावी.जिल्हा परिषद काम बाटप समिती व सभापती कक्ष दुरुस्ती कामातील कथित अनियमिततेची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार असणाऱ्यावर कारवाई करावी.मनोज पवार, खामकर व सुहास जाधव यांच्या कामकाजाचा लेखापरीक्षण अहवाल सार्वजनिक करावा.

संभाजीनगर येथील निकृष्ट दर्जाच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याची तांत्रिक चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी. जिल्हा शासकीय रुग्णालयातील रुग्णसेवा, प्रलंबित वैद्यकीय बिले व प्रशासकीय अनियमिततेची चौकशी करून तात्काळ सुधारणा करावी. तसेच गंभीर तक्रारींची दखल घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर आवश्यक ती कारवाई करावी.

वरील मागण्यांवर तात्काळ कार्यवाही न झाल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) च्या वतीने महाराष्ट्र प्रदेश महासचिव दादासाहेब ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही मार्गाने तीव्र निषेध आंदोलन, घोषणाबाजी व बेमुदत उपोषण सुरूच ठेवण्यात आले आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष मदन खंकाळ, कामगार यूनियनचे जिल्हाध्यक्ष राम मदाळे, पदाधिकारी, कार्यकर्ते व पाठीबा देणारे वंचितचे महाबळेश्वर तालुकाध्यक्ष उत्तम भालेराव,मिलिंद कांबळे,ॲड.विलास वहागावकर व अनिल वीर उपस्थित होते.

माजलगाव जलशयातील मत्स्य पालनासाठी दहा वर्षे भाडे तत्त्व देण्याची प्रक्रिया तात्काळ स्थगित करा, व स्थानिक मच्छीमारांना प्राधान्य द्या

भोई समाजाचे युवा नेते भिमा गहिरे .यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदनाद्वारे केली मागणी



बीड बडवणी/ प्रतिनिधी

माजलगावचे जलाशयातील स्थानिक व पारंपारिक मच्छीमारांचे हक्काचे उल्लंघन होत आहे ,पन्नास वर्षापासून बीड जिल्ह्यातील ४० ते ५० गावातील ८०० पेक्षा जास्त मच्छीमार कुटुंब व जलशयात पारंपरिक पद्धतीने मासेमारी करून उदरनिर्वाह करतात, माजलगाव जलाशयातील स्थानिक मच्छीमारांचा रोजगाराचा प्रश्न या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील व माजलगाव तालुक्यातील हजारो लोक बेरोजगार होतील ,त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ होईल, सदरील माजलगाव जलाशयाचे टेंडर संदर्भात ई टेंडर नोटीस मध्ये पारदक्षता नाही माजलगाव जलश्यातील संदर्भातील सर्व प्रक्रिये तात्काळ स्थगिती करण्यात यावी ,व माजलगाव जलाशयातील मत्स्यपालनासाठी दहा वर्षे भाड तत्त्व देण्याची प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी व स्थानिक मच्छीमारांना प्राधान्य देण्यात यावे ,आमच्या मागणीचा विचार न झाल्यास आम्ही तात्काळ भोई समाज रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा भोई समाजाने दिला आहे, या संदर्भात राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्णा विखे यांना निवेदनाद्वारे भोई समाजाचे जिल्हाध्यक्ष भीमा गहीर यांनी मागणी केली आहे ,

पत्रकार समाजभूषण कैलास गायकवाड यांना 'महाराष्ट्र भुषण पुरस्कार - २०२६' जाहीर

तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने सन्मान



विशेष पत्रकार / कैलास गायकवाड

आंबेगाव, पुणे: पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील आदर्श समाजसेवक व पत्रकार समाज भूषण मा. कैलास बबनराव गायकवाड यांना तथागत बहुउद्देशीय संस्था मेहकर द्वारा आयोजित व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार - २०२६' जाहीर करण्यात आला आहे.समाजसेवा आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून गायकवाड यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर झाला आहे. आंबेगाव तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे.

हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे समस्त पदाधिकारी, महिला आघाडी व कार्यकर्त्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

संघटनेच्या वतीने लवकरच सन्मान सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. पत्रकार समाज भूषण कैलासराव गायकवाड यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल भटक्या मुक्त जाती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवलाल जाधव तसेच जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक दादा वळसे पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

जागतिक आदिवासी दिन उरण मध्ये उत्साहामध्ये संपन्न



तालुका प्रतिनिधी / विठ्ठल ममताबादे

उरण : ९ ऑगस्ट क्रांती दिन आणि जागतिक आदिवासी दिन म्हणून संपूर्ण भारतभर हा दिवस आदिवासी समाजाच्या वतीने राबवला जातो म्हणूनच उरण शहरांमध्ये उरण तालुका आदिवासी कातकरी आणि ठाकूर समाजाच्या वतीने हा दिवस उत्साहाने साजरा करण्यात आला. उरण बस स्टॉप येथून नाचत गाजत भव्य रॅली सुरू होऊन महात्मा गांधी चौक येथे महापुरुष महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. विशेष म्हणजे या रॅलीमध्ये उरणच्या नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर यांचे उपस्थिती सुद्धा पाहायला मिळाले. शेवटी तीर्थरूप नानासाहेब धर्माधिकारी नगरपालिका शाळा क्रमांक १ येथे रॅली आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज, भगवान बिरसा मुंडा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हुतात्मा नाग्या महादू कातकरी, राया ठाकर, त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर आदिवासी महिलांच्या वतीने पारंपारिक आदिवासी नृत्य सादर करण्यात आले या कार्यक्रमाच्या वेळी १९० उरण विधानसभेचे माजी आमदार मनोहर शेठ भोईर, उरणच्या नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर, पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आदिवासी समाजाची सध्याची परिस्थिती आणि पूर्वीची परिस्थिती याची माहिती सांगितली आणि आदिवासी समाजाच्या प्रत्येक कार्याच्या सहभागी होऊन आदिवासी समाजाच्या विकासासाठी जातीने लक्ष घालू असे शब्द त्यांनी दिले,आदिवासी समाजाच्या दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर,माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, परमानंद करंगुटकर, रायगड जिल्हा शिवसेना संघटक बी एन डाकी, माजी सभापती देवका वाघमारे, उरण पंचायत समिती सदस्य दीपक भोईर, नगरसेविका प्रार्थना म्हात्रे, गणेश सेवक, दत्तात्रय गोंधळी, नामदेव ठाकूर तसेच आदिवासी समाजातील अनेक गावातील पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश कातकरी, उपाध्यक्ष सुरेश पारधी, कार्याध्यक्ष रोशन कातकरी, नारायण बरतोड, सचिव अजय कातकरी, सहसचिव मनीष कातकरी, खजिनदार नामदेव पारधी, सह खजिनदार पंढरी कातकरी, तसेच मधुकर पारधी, दशरथ कातकरी, अर्जुन कातकरी, गणेश कातकरी (सातघर)सुनील नाईक, कमलाकर कातकरी, नामदेव बरतोड सर, गणेश कातकरी (जसाई)यांनी खूप मेहनत घेतली. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणामध्ये आदिवासी समाजाच्या महिला, पुरुष आणि लहान मुल आणि मुली उपस्थित होते.

जारकरवाडी प्राथमिक शाळेचा शिष्यवृत्ती परिक्षेत जिल्ह्यात डंका



विशेष प्रतिनिधी /कैलास गायकवाड

जारकरवाडी (ता.आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत सन २०२६ इयत्ता चौथीचे पाच व सातवीचा एक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून त्यांच्यावर कौतूकाचा वर्षाव होत आहे.

इयत्ता चौथीचे पात्र विद्यार्थी लावण्या महेश वनवे-२७६ गुण जिल्ह्यात पहिली, शरण्या संदीप वैद-२६४ गुण जिल्ह्यात सातवी, स्वरा सुरज लबडे-२५८ गुण जिल्ह्यात दहावी, संस्कृती एकनाथ भोजने-२५६ गुण जिल्ह्यात अकरावी, संस्कृती विशाल भांड-२५२ गुण जिल्ह्यात तेरावी, तर इयत्ता सातवी भावना संदीप भोजने-२०२ गुण तालुक्यात तिसरी हे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत.

इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना रेखा सुनील वळसे यांनी मुख्य मार्गदर्शक म्हणून काम केले तर इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांला सुदर्शन गंगाधर रासकर व गोरक्ष विष्णू उकिरडे यांनी सहकार्य केले. तर गंगुबाई वळसे, उज्वला नंदकुमार लंगडे,सुनीता गोपाळ रोडे,अशोक नामदेव किर्वे यांनी सहकार्य केले अशी माहिती मुख्याध्यापक

अब्दुलरहीमान जलील इनामदार,शिवाजी मारुती चासकर यांनी दिली.

यशस्वी ठरलेल्या विद्यार्थांचे व त्यांना मार्गदर्शन करणार्या शिक्षकांचे केंद्रप्रमुख मच्छिंद्र काळे,विस्तार अधिकारी कल्पना टाकळकर,गट विकास अधिकारी प्रमिला वाळुंज,गटशिक्षण अधिकारी रूपाली धोका तसेच शालेय व्यवस्थापन समिती,

समस्त पालक वर्ग, ग्रामपंचायत, विविध संस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

उंब्रजमध्ये ३० लिटर ताडी जप्त; तरुणावर गुन्हा दाखल

उंब्रज/ अमोल पवार

उंब्रज पोलिसांनी अवैधरीत्या ताडीची विक्री करणाऱ्या एका २० वर्षीय तरुणावर कारवाई करत ३० लिटर ताडी जप्त केली. ही कारवाई मंगळवारी (दि. १२) सायंकाळी उंब्रज येथील यशवंत कॉलनी, शिवडे रोड परिसरातील दफनभूमीजवळ करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विठ्ठल दिपक कुडाळकर (वय २०, रा. लक्ष्मीनगर, उंब्रज) हा झाडाच्या आडोशाला ताडीची चोरटी विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली असता त्याच्या ताब्यात १ लिटरच्या ३० प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरलेली एकूण ३० लिटर ताडी आढळून आली. जप्त करण्यात आलेल्या ताडीची अंदाजे किंमत १,५०० रुपये आहे. त्यातील १८० मिली ताडीचा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अनिल एकनाथ देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विठ्ठल कुडाळकर याच्याविरुद्ध उंब्रज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुन्हा दाखल करण्याची कारवाई पोलीस हवालदार पाटील यांनी केली. पुढील तपास रसाळ करीत आहेत.

क्रांती दिनानिमित्त खिंवसरा पाटील विद्यामंदिरात बालसभा

विद्यार्थ्यांनी दिला देशभक्तीचा संदेश, मोबाईल, टीव्ही व वाईट सवयींचा त्याग करून चांगले नागरिक बनण्याचे आसरामजी कसबे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

पुणे प्रतिनिधी / शकील मनियार

'जिथे सांडले रक्त देशासाठी, तो पवित्र इतिहास गाऊया आज; नमन करूनी त्या शूर वीरांना, ज्यांनी सजवला स्वातंत्र्याचा साज,' या देशभक्तीपर भावनेतून खिंवसरा पाटील विद्यामंदिर येथे क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी बालसभेच्या माध्यमातून क्रांती दिनाचा इतिहास आणि देशभक्तीची भावना प्रभावीपणे मांडली.

क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे संचालक सदस्य आसरामजी कसबे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'हो जाओ तैय्यार सखियों' असे म्हणत त्यांनी देशासाठी बलिदान देणाऱ्या क्रांतिकारकांच्या कार्याची माहिती दिली. आजच्या काळात देशासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईल फोनचा अतिवापर टाळणे, वाईट सवयींपासून दूर राहणे, टीव्ही पाहण्याचे प्रमाण कमी करणे आणि अभ्यासासोबत चांगल्या संस्कारांचा अंगीकार करणे, हेच खरे बलिदान असल्याचे त्यांनी



सांगितले. विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.


क्रांती दिनानिमित्त शाळेत समूहगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विविध इयत्तांतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. इयत्ता पहिलीने 'जिंकू किंवा मरू', इयत्ता दुसरीने 'हिंद देश के निवासी' व 'जय जय महाराष्ट्र माझा', इयत्ता तिसरीने 'हो जाओ तैयार' व 'चंदन है इस देश की मिट्टी', इयत्ता चौथीने 'हा देश माझा' व 'हम होंगे कामयाब', इयत्ता पाचवीने 'हो जाओ तैयार' व 'समरवीर', इयत्ता सहावीने 'हा देश माझा' व 'हे राष्ट्र देवतांचे', तर इयत्ता सातवीने 'स्वर्ग से सुंदर देश हमारा' व 'राष्ट्र की जय चेतना का' या समूहगीतांचे सादरीकरण केले.

स्पर्धेचे परीक्षण प्रज्ञा फुलपगार आणि वीणा तांबे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी सृष्टी देवरे हिने केले. दिव्या भोसले हिने प्रस्ताविक केले, तर प्रीती रणपिसे हिने विद्यार्थी मनोगत व्यक्त केले. शिक्षक मनोगत कृतिका काळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार शिवन्या खरे हिने मानले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित विविध नाटिकांचेही सादरीकरण करण्यात आले. इयत्ता सहावी 'अ'च्या विद्यार्थ्यांनी 'न्यायनिवाडा अहिल्यादेवींचा', सहावी 'ब'च्या विद्यार्थ्यांनी 'अहिल्यादेवी होळकरांचे बालपण', तर सातवी 'अ'च्या विद्यार्थ्यांनी 'दैवी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व्यक्तिमत्त्व' ही नाटिका सादर केली. इयत्ता पाचवी 'ब'ची विद्यार्थिनी वैष्णवी कांबळे हिने 'अहिल्यादेवी होळकर स्वगत' प्रभावीपणे सादर केले.

कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापिका मंजुषा गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली स्मिता जोशी आणि कृतिका काळे यांनी केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून क्रांती दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

जन आरोग्य अभियानांतर्गत कवठे येमाई प्राथमिक आरोग्य केंद्रात आढावा बैठक



कवठे येमाई /प्रतिनिधी :

कवठे येमाई: जन आरोग्य अभियानांतर्गत कवठे येमाई येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात विविध आरोग्यविषयक समस्यांचा व उपलब्ध सुविधांचा आढावा घेण्यासाठी बैठक पार पडली.

या बैठकीस जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे, पंचायत समिती सदस्या कांचनताई सांडभोर, पांडुरंग भोर, रामदास सांडभोर, रितेश शहा, अविनाश पोकळे, गुलाब बागरे, विठ्ठल मुंजाळ तसेच तंटामुक्ती उपाध्यक्ष बबुशा पाटील कांदळकर यांच्यासह आरोग्य केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील उपलब्ध आरोग्य सुविधा, रुग्णांना भेडसावणाऱ्या अडचणी, आवश्यक वैद्यकीय साधनसामग्री तसेच केंद्रासाठी आवश्यक असलेल्या विविध सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार व वेळेवर आरोग्य सेवा मिळण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र सक्षम असणे गरजेचे असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असून, आवश्यक त्या सुविधा पुरविण्याचे आश्वासन जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे यांनी यावेळी दिले.

बुलढाण्याबरोबर परभणीचेही 'नामकरण' व्हावे !



परभणी (प्रतिनिधी) :

'महाराष्ट्रातील आणखी एका जिल्ह्याचं नाव बदलण्याची मागणी पुढे आली आहे. बुलढाणा जिल्ह्याला 'राजमाता जिजाऊनगर' असे नाव देण्याची मागणी भाजपच्या महिला आमदार श्वेता महाले यांनी केली आहे. यासाठी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक निवेदन दिले असून, मुख्यमंत्र्यांनी या मागणीची दखल घेत प्रशासनाला पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याची माहिती समजते आहे.

महाराष्ट्रात यापूर्वी तीन जिल्ह्यांच्या नामांतराचे निर्णय घेण्यात आले आहेत. औरंगाबादचे नाव बदलून त्या ऐवजी छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबाद ऐवजी धाराशिव आणि अहमदनगरचे नाव बदलून तेथे अहिल्यानगर असे करण्यात आले आहे. आता त्याच धर्तीवर बुलढाणा जिल्ह्याचे नाव बदलावे, अशी मागणी श्वेता महाले यांनी केली आहे.

राजमाता जिजाऊ साहेबांची जन्मभूमी असलेले सिंदखेड राजा हे सुध्दा याच जिल्ह्यात येत असल्याने या भागाला त्यांचे नाव देणे योग्य ठरेल, अशी भूमिका सदर महिला आमदारांनी मांडली आहे.

तथापि मराठवाड्यातील परभणी जिल्ह्याच्या नावाला देखील असाच धार्मिक, सांस्कृतिक आणि भावनिक वारसा लाभला आहे. समस्त मराठवाडा वासीयांचे त्या नावाशी ऋणानुबंध आहेत. तत्कालीन मंत्री दिवाकर रावते त्यांनी आपल्या मंत्रीपदाच्या कार्यकाळात व त्या अगोदरही सदर नावाला प्राधान्य दिले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. तद्वतच हे नाव प्रत्येकांच्या हृदयावर कोरल्या सारखे जागवत होते.

'मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनात बुलढाणा जिल्ह्याच्या ऐतिहासिक, धार्मिक आणि पर्यटनविषयक महत्त्वाचा उल्लेख करण्यात आला आहे. जगप्रसिद्ध जिजाऊसाहेबांचे जन्मभूमी असल्याने बुलढाणा जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे आमदार श्वेता महाले यांनी म्हटले आहे. बाल शिवबांच्या मनात हिंदवी स्वराज्याची संकल्पना रुजवण्यात जिजाऊसाहेबांचे महत्त्वपूर्ण योगदान होतं. त्यांच्या संस्कारातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखा युगपुरुष घडला, असेही पत्रात

'मराठवाडा विधायक विकास संसद' ची मागणी

लोणार सरोवर, संत गजानन महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले शेगाव, मेहकरमधील श्री शारंगधर बालाजी मंदिर, ज्ञानगंगा अभयारण्य आणि सैलानी बाबा दर्गा यांसारखी अनेक ठिकाणं जिल्ह्यात आहेत. या स्थळांमुळे देश-विदेशातून पर्यटक येथे येत असतात. त्यामुळे 'राजमाता जिजाऊनगर' हे नाव जगभर पोहोचण्यासही मदत होईल, असा दावा पत्रात करण्यात आला आहे.

जिजाऊंचं योगदान आणि सन्मानाचा दावा

सिंदखेड राजा ही राजमाता जिजाऊसाहेबांची जन्मभूमी असल्याने बुलढाणा जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे आमदार श्वेता महाले यांनी म्हटले आहे. बाल शिवबांच्या मनात हिंदवी स्वराज्याची संकल्पना रुजवण्यात जिजाऊसाहेबांचे महत्त्वपूर्ण योगदान होतं. त्यांच्या संस्कारातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारखा युगपुरुष घडला, असेही पत्रात नमूद करण्यात आलं आहे. त्यामुळे त्यांच्या जन्मभूमीचा सन्मान करण्यासाठी जिल्ह्याचे नाव 'राजमाता जिजाऊनगर' करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

परभणी जिल्ह्याला सुध्दा प्राचीन ऐतिहासिक वारसा आणि धार्मिक परंपरा :

जुन्या काळात परभणीचे नाव 'प्रभावती नगरी' असंच होतं. येथे देवी प्रभावतीचे मोठे मंदिर आहे. कालांतराने या नावाचा अपभ्रंश होऊन ते प्रभावती नगरीऐवजी 'परभणी' हे नाव रूढ झाले. हा प्रदेश प्राचीन विदर्भ राज्याचा भाग होता असेही समजतेय परंतु नंतरच्या काळात तो निजाम राजवटीखाली राहिला, जो १९४८ मध्ये भारतीय संघराज्यात विलीन झाला.

ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि प्राचीन वारसा :

परभणीचा परिसर सातवाहन, यादव आणि त्यानंतर मुघल तथा बहमनी सुलतानांच्या राजवटीखाली होता. तर, सन १९४८ मधील 'ऑपरेशन पोलो' (हैदराबाद मुक्ती संग्राम) पर्यंत हा जिल्हा हैदराबादच्या निजामी राजवटीतही होता.जिंतूरची लेणी : जिंतूर येथील नेमिगिरी जैन लेणी आणि येथील प्राचीन मंदिरे जिल्ह्याचा मध्ययुगीन व धार्मिक इतिहास आजही सांगतात.जिंतूर तालुक्यातील चारठाणा गावात अनेक प्राचीन आणि ऐतिहासिक शिल्पकलेची मंदिरे आहेत.धार्मिक पार्श्वभूमी (संतांची भूमी) पाथरी : श्री साईबाबांचे जन्मस्थान म्हणून पाथरी हे शहर जगभर प्रसिद्ध आहे, जेथे भक्त असे साई जन्मस्थान मंदिर आहे.संत जनाबाई व गंगाखेड : संत जनाबाईचे जन्मस्थान असलेले गंगाखेड हे गोदावरी नदीकाठचे एक महत्त्वाचे पवित्र धार्मिक व वारकरी तीर्थक्षेत्र आहे.

मुदगलेश्वर मंदिर: गोदावरी नदीच्या पात्रात आणि काठावर वसलेले ९०० वर्षांहून अधिक जुने व ऐतिहासिक असे मुदगल येथील मुदगलेश्वर मंदिर प्रसिद्ध आहे.

पोखर्णी देवस्थान : येथील भगवान श्री नृसिंह मंदिर दूर-दूरवरच्या भाविकांचे मोठे श्रद्धास्थान आहे.

महासंवाद'पुरते मर्यादित न राहता सातत्याने मार्गदर्शनाचा संकल्प. ! :ठाणेदार संदीप कापडे



देवळी : विद्यार्थ्यांसह युवक-युवती आणि पालकांना बदलत्या काळातील आव्हानांची जाणीव करून देत त्यांच्या उज्ज्वल भविष्याशी योग्य दिशा मिळावी, या उद्देशाने वर्धा जिल्हा पोलीस दलांतर्गत पोलीस स्टेशन देवळीच्या वतीने 'पोलीस-युवा महासंवाद' या विशेष जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

१० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता विदर्भ केसरी रामदास तडस इनडोअर स्टेडियम, देवळी येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना करिअरच्या योग्य संधी व दिशा, सोशल मीडियाचा गैरवापर, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण तसेच वाढत्या व्यसनाधीनतेचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

डॉ. रोजीना राणा (मानसोपचारतज्ज्ञ, नागपूर) यांनी करिअर घडविताना विद्यार्थ्यांनी स्वतःची क्षमता ओळखून योग्य ध्येय निश्चित करण्याचे आवाहन केले. डॉ. तन्मय दीक्षित (सायबर एक्स्पर्ट, नाशिक) यांनी सोशल मीडियाचा वाढता गैरवापर, ऑनलाइन फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक खबरदारीबाबत मार्गदर्शन केले. डॉ. सुधीर भावे यांनी व्यसनाधीनतेचे शरीर, मन आणि कुटुंबासह सामाजिक जीवनावर होणारे गंभीर परिणाम स्पष्ट केले. तसेच वसंत हंकारे यांनी विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये, पालकांशी संवाद आणि योग्य संगतीचे महत्त्व पटवून दिले.

देवळी पोलिसांचा पुढाकार ; व्यसनमुक्ती, सायबर सुरक्षा व सोशल मीडियाच्या अतिरेकाविरोधात जनजागृतीचा निर्धार

आले.

कार्यक्रमाच्या 'महासंवाद'पुरते मर्यादित न राहता सातत्याने मार्गदर्शनाचा संकल्प हा देवळी पोलीस ठाण्याच्या वतीने विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अशा प्रकारचे व्यसनमुक्ती, सोशल मीडियाचा अतिरेक टाळणे, सायबर सुरक्षेबाबत जागरूकता आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे मार्गदर्शनपर कार्यक्रम भविष्यातही सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याचे ठाणेदार संदीप कापडे यांनी सांगितले.

शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी भेट संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेण्यासह त्यांना योग्य मार्गदर्शन देण्यावर पोलिसांचा भर राहणार आहे.

विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित, व्यसनमुक्त आणि सायबर गुन्ह्यांपासून संरक्षित करण्यासाठी देवळी पोलिसांनी घेतलेला हा पुढाकार निश्चितच कौतुकास्पद असून, पोलीस आणि युवा यांच्यातील संवाद अधिक दृढ करणारा ठरणार आहे.

जि. प. नागपूर मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांची भिवापूर तालुक्याला भेट



नागपूर / दिलीप येवले

जि. प. नागपूर मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी भिवापूर तालुक्याला भेट दिली. उपमुख्यकार्यकारी अधिकारी कुणाल उंदीरवाडे तालुका नोडल अधिकारी व गट विकास अधिकारी भिवापूर डॉ. चेतन जाधव हे उपस्थित होते.

तास हद्दीतील मातोश्री पांदणरस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली. तास गावकरी, जिप शाळा व आश्रमशाळेच्या विद्यार्थी यांनी वृक्षदिंडी वृक्षपालखी तिरंगा ध्वजसह एकूण ४०० झाडांचे वृक्षारोपण केले. तास ग्रामपंचायत अंतर्गत ऑन्ड्रेन्ग्रुन्ड भेट देत फित कापत विद्यार्थीशी संवाद साधला. ग्रामपंचायत तास येथे भेट देवून ग्रामपंचायत नियोजन स्वच्छता व नाविन्यपूर्ण बाबी विषयी सर्व ग्राम पं. पदाधिकारी यांचेशी चर्चा करण्यात आली. ग्रामपंचायत नखी अंतर्गत ऑन्ड्रेन्ग्रुन्ड भेट, स्मार्ट अंगणवाडी भेट व २०० वृक्षरोपण करण्यात आले. विद्यार्थी विविध वेशभूषा करत तिरंगा ध्वजसह उपस्थित होते.

ग्रामपंचायत चीचाळा येथे शाळा पाहणी, स्मार्ट आंगनवाडी भेट देण्यात आली. ग्राम पं. बोटेझरी येथे तलाव काठी २०० वृक्षरोपण करण्यात आले. मुचेपार व वर्ग तीर्थक्षेत्र येथे भेट देवून उपविभाग बांधकामकडून माहिती घेण्यात आली. ग्रामपंचायत नांद येथे ड्रीम प्रोजेक्ट अंतर्गत जिल्हातील सर्वात मोठी लायब्ररी फित कापून विद्यार्थींसाठी सुरू करण्यात आली त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

ग्रामपंचायत नांदमधील ई-अंगणवाडीला भेट देण्यात येवून अंगणवाडी सेविकाकडून डेमो घेण्यात आली. त्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले तसेच जिप शाळेतील विद्यार्थी यांचेशी संवाद साधण्यात आला.

हजियानी खातिजा बाई गर्ल्स हायस्कूल, कामठी येथे सायबर हायजीन व सायबर एथिक्स जनजागृती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन



नागपूर : एडुसन फाउंडेशनतर्फे नागपूर पोलिसांच्या सायबर सेलच्या सहकार्याने शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ रोजी हजियानी खातिजा बाई गर्ल्स हायस्कूल, कामठी येथे विद्यार्थींसाठी सायबर हायजीन व सायबर एथिक्स जनजागृती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या जनजागृती कार्यक्रमात इयत्ता ९ वी व १० वीच्या ४१२ विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थिनींना सायबर हायजीन, सायबर एथिक्स, ऑनलाइन सुरक्षितता, सायबर सुरक्षा, सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध, डिजिटल तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर तसेच जबाबदार डिजिटल नागरिकत्व याबाबत जागरूक करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या आचल चित्तारे (सायबर सेल, नागपूर पोलीस) होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना विविध प्रकारचे सायबर फ्रॉड, डिजिटल फसवणूक, ऑनलाइन धोके, टास्क फ्रॉड तसेच सोशल मीडिया, मोबाईल ?प्लिकेशन्स आणि इतर डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करताना घ्यावयाच्या आवश्यक खबरदारीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सुरक्षित ऑनलाइन वर्तन, सायबर सुरक्षा, सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध, डिजिटल फूटप्रिंट्स, ऑनलाइन ओळख व गोपनीयता, सायबर धमकी, ऑनलाइन छळ, सोशल मीडिया वापरासंबंधित नियम व जबाबदारी, तसेच सायबर गुन्ह्यांची तक्रार नोंदविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाला संबोधित करताना एडुसन फाउंडेशनचे कार्यक्रम समन्वयक निलेश काळे यांनी सध्याच्या डिजिटल युगात सायबर जागरूकतेची वाढती गरज अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, डिजिटल साक्षरता, सायबर हायजीन आणि जबाबदार ऑनलाइन वर्तन ही आज प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आवश्यक जीवनकौशल्ये आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती रफिया शहनाज होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना कार्यशाळेत मिळालेल्या ज्ञानाचा आपल्या दैनंदिन डिजिटल जीवनात उपयोग करण्याचे तसेच जबाबदार आणि जागरूक डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन केले.

यावेळी कामठी पोलिसांचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एच) योगेश नाल्दे यांचीही उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षा जागरूकता वाढविण्यासाठी स्थानिक पोलिसांची बांधिलकी अधोरेखित झाली.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन माहेर निगार यांनी केले. या प्रसंगी मंचावर सामाजिक कार्यकर्त्या व प्राध्यापिका इशरत खान, श्रीमती इशरत अंजुम तसेच ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती अंजुम अफरोज यांचीही उपस्थिती होती.

आदर्श संकुलात 'शिस्त, नेतृत्व आणि सेवाभावाची शपथ

विद्यार्थी पदग्रहण सोहळा संपन्न

विटा/शाहानवाज मुल्ला

लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित आदर्श पब्लिक स्कूल सी. बी. एस. ई. विटा मध्ये विद्यार्थी पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने आणि ध्वजारोहणाने झाली. दीपप्रज्वलन आणि ध्वजारोहण प्रमुख पाहुणे मा. श्री. उत्तम मोहिते सर, ज्येष्ठ प्राध्यापक हणमंतराव पाटील कॉलेज, विटा यांच्या शुभहस्ते झाले. शाळेतील विद्यार्थिनी कु. गायत्री पाटील हिने विद्यार्थ्यांना पदग्रहणाची प्रतिज्ञा दिली. नंतर शाळेतल्या जुन्या पदाधिकारी असलेल्या विद्यार्थ्यांनी नवीन निवडून आलेल्या विद्यार्थ्यांना शुपचे प्रतीक असलेले ध्वज सोपवले.



नवीन निवडून आलेल्या विद्यार्थ्यांना बॅच व बिल्ले देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले उत्तम मोहिते सर यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांपेक्षा पालकांची जबाबदारी जास्त असल्याचे सांगितले तर विद्यार्थी नेतृत्व हे केवळ पद नसून सेवा, शिस्त आणि कर्तव्याची जबाबदारी आहे.' असे प्रतिपादन प्रशालेचे प्राचार्य मा.श्री. अवधूत खरात यांनी केले. यानिमित्त संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री सदाशिवराव भाऊ पाटील तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. श्री वैभवदादा पाटील यांनी नवीन निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. हा सर्व कार्यक्रम संस्थेचे कार्यकारी संचालक मा.श्री. पी.टी.पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी शाळेचे प्रशालेचे प्राचार्य मा.श्री अवधूत खरात, उपप्राचार्य मा.श्री.निलेश भोसले, पर्यवेक्षिका मा. सौ. राजश्री चव्हाण तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. रजनी तळेकर, क्रीडा विभाग प्रमुख मा. श्री. वैभव सदामते, कलाविभाग प्रमुख प्रमोद दिवाणजी यांचे विशेष सहकार्य लाभले. याप्रसंगी सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्रमिला लावंड यांनी केले तर आभार सौ. राजलक्ष्मी सदामते यांनी केले.



महा- ई सेवा केंद्र कॅम्पचा लाभ किकलीकरांनी घेतला !

सातारा / अनिल वीर

प्रवाह सामाजिक संस्था वाई व सिद्धार्थ तरुण मंडळ किकली यांच्या संयुक्त विद्यमाने सिद्धार्थ बुद्ध विहार, किकली,ता.वाई येथे एक दिवसीय महा-ई-सेवा केंद्र कॅम्प संपन्न झाला. गावातील बहुसंख्य ग्रामस्थांनी लाभ घेत विविध योजनांची कार्ड व कागदपत्रे काढून घेतली. यामध्ये आधार कार्ड,उद्योग आधार,एसटी पास कार्ड,ईश्रम कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, आभा कार्ड,फार्मर आयडी आदी ई.कार्डस समावेश होता. सदरच्या कॅम्पचा विशेष फायदा ज्येष्ठ नागरिक, अपंग नागरिक, शेतकरी व गृहिणी - महिला यांना झाला.यावेळी अल्पदरात व वेळेची बचत करत सर्व कार्डस घरबसल्या काढता आल्यामुळे सर्व नागरिकांनी समाधान व्यक्त केले.या शिबिराचे आयोजन युवा सामाजिक कार्यकर्ते रोहित वाघमारे, अक्षय कांबळे आदींने केले.

कामठी येथील ड्रॅगन पॅलेस टेम्पलला विख्यात जपानी उद्योजक सुझुकी यासुमी यांची सदिच्छा भेट

(बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी सहकार्याचा संकल्प)



नागपूर / दिलीप येवले

जागतिक ख्यातीचे श्रद्धास्थान असलेल्या कामठी येथील आंतरराष्ट्रीय ड्रॅगन पॅलेस टेम्पलला जपानच्या सुझुयासु ग्लोबल नेटवर्किंग सर्व्हिसेस प्रा. लि.चे माजी महाव्यवस्थापक व प्रसिद्ध बिझनेस कन्सल्टंट सुझुकी यासुमी यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी त्यांनी तथागत भगवान बुद्ध यांच्या प्रतिमेला वंदन करून आपला श्रद्धाभाव अर्पण केला. ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या मुख्य संरक्षक ?ड. सुलेखाताई कुंभारे यांनी सुझुकी यासुमी यांचे भारतीय परंपरेनुसार पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. उभयतांमध्ये झालेल्या बैठकीत तथागत बुद्धांच्या मानवतावादी विचारांचा जागतिक स्तरावर प्रचार आणि प्रसार करण्यासाठी विविध शैक्षणिक उपक्रम, आंतरराष्ट्रीय परिसंवाद चर्चासत्रे आणि औद्योगिक विकासात्मक उपक्रम संयुक्तपणे राबविण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

या संस्मरणीय भेटीबद्दल भावना व्यक्त करताना ते म्हणाले, 'बदलाचा भगवान बुद्धांच्याच प्रेरणेमुळे आणि अनेक योगायोगांमुळे मी आज या पवित्र भूमीत येऊ शकलो. हा अनुभव माझ्यासाठी खरोखरच अत्यंत आनंददायी आणि मनःशांती देणारा आहे. भगवान बुद्ध यांनी मला येथे येण्याच्या संधीचे सोने करण्यासाठी मदत केली आणि ॲड. सुलेखाताई कुंभारे यांनी मला असीम आदरातिथ्य दिले. त्यांच्या धम्मकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. मला पूर्ण खात्री आहे की, नजीकच्या काळात मी या पवित्र वास्तूला पुन्हा नक्कीच भेट देईन. सुझुकी यासुमी पुढे म्हणाले की, 'ड्रॅगन पॅलेस टेम्पल हे केवळ भारताचेच नाही, तर संपूर्ण जगभर तथागत भगवान बुद्धांच्या अहिंसा, शांती आणि सत्याचा संदेश पसरवीत आहे. ॲड. सुलेखाताई कुंभारे यांच्या संकल्पनेतून आणि अथांग परिश्रमातून आज जपानसारख्या देशांमध्ये तसेच विश्वभर भगवान बुद्धांच्या विचारांचा प्रसार होत आहे. अशा महान आणि पावन भूमीवर येण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ?ड. सुलेखाताई कुंभारे यांचे बौद्ध धम्माच्या प्रचाराचे कार्य अतुलनीय आहे, असेही ते म्हणाले. या आंतरराष्ट्रीय भेटीमुळे ड्रॅगन पॅलेसच्या माध्यमातून भगवान बुद्धांचे विचार जागतिक स्तरावर पोहोचविण्याच्या मोहिमेला अधिक बळ मिळणार असून, परिसरातील बौद्ध बांधव व नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे.

लोककलेच्या संवर्धनासाठी झटणारे वसंतराव जगताप उर्फ अण्णांचा मुंबईत सन्मान

सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार साहेब तसेच मराठी तमाशा परिषदेचे अध्यक्ष माननीय संभाजी राजे जाधव साहेब यांच्या उपस्थितीत गौरव



पुणे प्रतिनिधी/ शकील मनियार

मुंबई येथील रवींद्र नाट्यमंदिरात आयोजित विशेष कार्यक्रमात वेल्हे गावचे सुपुत्र, ज्येष्ठ सामाजिक व सांस्कृतिक वारसा जपणारे कार्यकर्ते माननीय वसंतराव जगताप साहेब उर्फ अण्णा यांचा सन्मान करण्यात आला. सांस्कृतिक कार्यमंत्री माननीय आशिष शेलार साहेब तसेच मराठी तमाशा परिषदेचे अध्यक्ष संभाजी राजे जाधव साहेब यांच्या उपस्थितीत अण्णांचा गौरव करण्यात आल्याने वेल्हे पंचक्रोशीसह तमाशा व लोककला क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वसंतराव जगताप उर्फ अण्णा हे गेल्या अनेक वर्षांपासून वेल्हे येथे सांस्कृतिक लोककला महोत्सवाचे आयोजन करत आहेत. या महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध भागांतील असंख्य लोककलावंतांना आपली कला सादर करण्याची संधी मिळत आहे. विशेष म्हणजे नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अण्णा सातत्याने करत आहेत.गतवर्षी २०२५ मध्येही वेल्हे येथे सांस्कृतिक लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सांस्कृतिक कार्यमंत्री माननीय आशिष शेलार साहेबयांना अण्णांनी प्रमुख पाहुणे म्हणून विशेष आमंत्रित केले होते. मात्र, काही तांत्रिक अडचणींमुळे मंत्री महोदयांना कार्यक्रमास उपस्थित राहता आले नव्हते.

या महोत्सवात विविध क्षेत्रातील मान्यवरांना 'संगीतरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आले होते. त्यामध्ये तृप्ती फिल्म प्रोडक्शनचे निर्माते रामदास राऊत सर यांचाही स्वर्गीय संगीत रत्न दत्ता महाडिक जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते तृप्ती फिल्म प्रोडक्शनच्या शिरूर यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या कलाविषयक कार्याची दखल घेत वसंतराव जगताप यांनी राऊत सरांची पुरस्कारासाठी निवड करून त्यांचा सन्मान केला होता.

'कलाकारांविषयी असलेला जिव्हाळा, प्रेम आणि आपुलकी हेच अण्णांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रातील असंख्य कलाकार अण्णांवर मनापासून प्रेम करतात. आजही कलाकारांची मोठी ताकद अण्णांच्या पाठीशी आहे आणि भविष्यातही ती कायम राहील,' असा विश्वास तृप्ती फिल्म प्रोडक्शनचे निर्माते रामदास राऊत यांनी व्यक्त केला.

लोककलेच्या संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या वसंतराव जगताप उर्फ अण्णांच्या कार्याचा मुंबईत झालेला सन्मान हा वेल्हे गावासह संपूर्ण पंचक्रोशी आणि तमाशा व लोककला क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. भविष्यातही अण्णांच्या हातून लोककला, कलाकार आणि नवोदित कलावंतांसाठी असेच अविरत कार्य सुरू राहावे, अशा शुभेच्छा यावेळी रामदास राऊत सर यांनी व्यक्त करण्यात आल्या.

ग्रंथपाल दिनानिमित्त हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन



आष्टी (शहीद) : येथील हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. ए. ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रदर्शनात स्पर्धा परीक्षा विषयक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, कथा-कादंबऱ्या तसेच विविध प्रकारचे वाचनीय साहित्य विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यावेळी प्राचार्य डॉ. एन. ए. ठाकरे यांनी डॉ. रंगनाथन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच ग्रंथालयशास्त्राची पाच सूत्रे विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

कार्यक्रमाचे आयोजक प्रा. एस. डी. अवथरे यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालय व ग्रंथांचे महत्त्व पटवून देत नियमित वाचनाची सवय विकसित करण्याचे आवाहन केले. ग्रंथ प्रदर्शनाला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी महाविद्यालयातील डॉ. डी. टी. स्वर्गे, डॉ. पी. एस. ठाकरे, प्रा. आर. एल. गुल्हाने, प्रा. व्ही. आर. चिंचमलातपुरे, प्रा. पी. डब्ल्यू. धनविज, डॉ. यू. डब्ल्यू. फुले, प्रा. सागर गोरले, डॉ. तुषार नायकुजी, प्रा. कुशल तीनखेडे, प्रा. कमलनारायण उईके, प्रा. सुमित काळपांडे, डॉ. विजय खाजोने, डॉ. सरिता राऊत, प्रा. सुनम्रता खत्री, प्रा. वंदना जांभुळकर, प्रा. झेनम खान तसेच महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

ग्रंथ प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. मनोहर राठोड व श्री. अरुण नेवाळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. एस. डी. अवथरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

साई ट्रस्ट ज. ने. पोर्ट विद्यालयाचा कु. नमित प्रदीप वाघावले राष्ट्रीय ग्रामीण गुणवत्ता यादीत १० वा तर उरण तालुक्यातून १ ला

तालुका प्रतिनिधी /विठ्ठल ममताबादे

उरण : साई ट्रस्ट ज ने पोर्ट विद्यालय शेवा प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमाचा हुशार, मेहनती आणि गुणी विद्यार्थी कु. नमित प्रदीप वाघावले याने प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २९८पैकी २४० गुण मिळवून रायगड जिल्हा राष्ट्रीय ग्रामीण गुणवत्ता यादीत १० वा आणि शाळेतून १ ला व उरण तालुक्यातून १ ला येण्याचा बहुमान पटकावला आहे. त्याला वर्ग शिक्षिका श्रीम. वंदना कपूर, श्रीम. सारिका तायडे, श्रीम. योगसाधना पाटील, श्रीम. सचिता वाघावले या मेहनती शिक्षिकांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले.



तसेच कु. नमित याचे पालक यांनी सुध्दा खूप मेहनत घेतली. कु. नमित वाघावले याने शाळेचे नाव संपूर्ण रायगड जिल्ह्यात उंचावले आहे. तसेच शाळेचे ७ हुशार व मेहनती विद्यार्थी उत्तीर्ण (पात्र)झाले आहेत.त्याच्या या उज्ज्वल यशाबद्दल साई ट्रस्ट चे अध्यक्ष नरसू पाटील ,शाळेचे मुख्याध्यापक रमाकांत गावंड, गिरीश पाटील,भुषण जाधव, अंकुश जोगळे, श्रीम. वैशाली बोरचटे, ज्येष्ठ कलाशिक्षक मिलिंद ठाकूर, श्रीम. सुमन पाटील, श्रीम. भारती कांबळे, पंडित गणेश बंडा, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक-शिक्षक संघ आणि पालक संघर्ष समिती पदाधिकारी आणि तमाम पालक वर्ग यांनी विशेष अभिनंदन केले आहे.त्याच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सायबर जनजागृती कार्यशाळेत २४६ विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षेचे प्रशिक्षण

नागपूर : नंदनवन, नागपूर येथील श्रीमती जानकीदेवी जैस्वाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवारी 'सायबर हायजीन आणि सायबर एथिक्स' या विषयावर सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात २४६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

हा कार्यक्रम एड्युस फाउंडेशन यांच्या वतीने आणि सायबर सेल, नागपूर पोलीस यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.



सायबर सेल, नागपूर पोलीसचे श्री. तन्मय रायसने हे कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रायसने यांनी सायबर हायजीन, तंत्रज्ञानाचा नैतिक वापर तसेच सायबर फसवणुकीच्या विविध प्रकारांबाबत माहिती दिली. गेमिंग ॲप्स, टास्कच्या नावाखाली होणारी फसवणूक, संशयास्पद 'इंक फाइल्स' तसेच सध्या चर्चेत असलेल्या 'डिजिटल अरेस्ट' या फसवणुकीच्या प्रकाराबाबत त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागरूक केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरेही दिली.

निलेश काळे यांनी सोशल मीडियाच्या अतिवापराचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक विकासावर होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी शिक्षण व कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करावे आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच चांगले चारित्र्य, सायबर बुलिंग आणि सोशल मीडियावरील जबाबदार वर्तनाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.तांदळे गुरुजी रिसोर्स अँड डेव्हलपमेंट सोसायटीचे अध्यक्ष दिलीप एम. तांदळे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्यासंदर्भात त्यांनी आपले अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले.

कार्यक्रमाला मुख्याध्यापिका संध्या जैस्वाल, उपमुख्याध्यापक विनोद काळे, विजय, निलेश काळे आणि दिलीप एम. तांडले यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



श्री. सुभाष केशवराव येनोरकर यांना 'राज्यस्तरीय श्री गुरुदेव जीवन गौरव पुरस्कार

प्रदान करून सन्मानित करण्यात आले

तळेगाव : हा पुरस्कार दि. ८ ऑगस्ट २०२६, शनिवार रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर या पावन भूमीत, पद्मश्री फाउंडेशन, नागपूर तसेच अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ, श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम यांच्या वतीने प्रदान करण्यात आला.

श्री. सुभाष केशवराव येनोरकर यांनी राष्ट्र संत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रसार, समाजासाठी सामाजिक व शैक्षणिक कार्य, व्यसनमुक्ती, ग्रामगीता प्रचार आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

त्यांच्या या उल्लेखनीय सन्मानाबद्दल पुढील सामाजिक कार्यासाठी अनेक कडून त्यांना शुभेच्छामिळत आहे

अवैध बांधकामे व अग्निसुरक्षा उल्लंघनाविरुद्ध प्रत्येक झोन मधील धोकादायक आस्थापनांवर आजपासून कारवाई

नागपूर : नागपूर शहरातील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत वापर व धोकादायक आस्थापनांविरुद्ध महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांनी एकत्रितपणे, समन्वयाने व कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करावी. असे निर्देश महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी दिले त्यानुसार, शहरातील सर्व दहाही झोन मध्ये अवैध बांधकामे व अग्निसुरक्षा उल्लंघनाविरुद्ध धोकादायक आस्थापनांवर गुरूवार (ता. १३) पासून कारवाई करण्यात येणार आहे.

नागपूर शहरातील अनधिकृत बांधकामे, मंजूर बांधकाम नकाशाविना करण्यात आलेले बांधकाम, अनधिकृत वापरबदल, अग्निसुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आस्थापना तसेच अतिक्रमण याबाबत संबंधित विभागांच्या समन्वयाने प्रभावी कार्यवाही करण्यासाठी महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेत आढावा बैठक घेण्यात आली. याप्रसंगी सत्तापक्ष नेते श्री नरेंद्र (बाल्या) बोरकर स्थापत्य व बांधकाम विशेष समिती सभापती श्रीमती अश्विनी जिचकार, अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती श्रीमती रूपाली ठाकूर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त मंगेश खवले, नगररचना विभाग, संबंधित झोनचे सहायक आयुक्त, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री राजेंद्र उचके, विभागीय अग्निशमन अधिकारी व सर्व केंद्र अधिकारी, अग्निशमन विभाग तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. त्यानुसार अवैध बांधकाम करणारे मॉल व व्यावसायिक संकुले, रुग्णालये (Hospitals) व शोरूम, गोडाऊन आणि तात्पुरत्या स्वरूपाच्या शेड/पेंडाल संरचना, ट्युशन क्लासेस, बार व रेस्टॉरंट्स, अनधिकृत वापर सुरू असलेल्या इमारती आणि अग्निसुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक आस्थापना यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

यापूर्वी विविध विभागांतर्गत होणारी स्वतंत्र कारवाई टाळून आता सर्व संबंधित विभाग समन्वय साधून 'संयुक्त पथकाद्वारे' कारवाई करणार आहेत. यामध्ये अग्निशमन विभाग, संबंधित झोन कार्यालय, प्रवर्तन विभाग, उपद्रव शोध पथक आणि नगररचना विभाग, पोलीस प्रशासन एकत्रित येऊन धडक मोहीम राबवतील. नगररचना विभागाने प्रत्येक झोनमधील मंजूर बांधकाम परवानग्या व प्रत्यक्ष वापर यांची झोननिहाय अद्ययावत यादी उपलब्ध करून दिली असून, मंजूर नकाशाविरुद्ध प्रत्यक्ष वापर होत असल्यास तत्काळ कायदेशीर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

बैठकीत "ऍक्शन" या इमारतींमध्ये मंजूर वापरच्या विरुद्ध अनधिकृत वापर होत असल्याचे निदर्शनास आल्याने पूर्वपरवानगीशिवाय करण्यात आलेल्या या फेरफारावर थेट सीलिंगची कारवाई करण्यात आल्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. नियमबाह्य वापराविरुद्ध मनपा कोणत्याही प्रकारची तडजोड करणार नाही, असा स्पष्ट संदेश यामुळे दिला गेला आहे.

ही विशेष मोहीम १३ ऑगस्ट २०२६ ते ०८ सप्टेंबर २०२६ या एका महिन्याच्या कालावधीत प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. प्रत्येक झोनने निवडलेल्या १० प्रकरणांची सविस्तर माहिती जसे की आस्थापनेचे नाव, मालक, मंजूर व प्रत्यक्ष बांधकाम, अनधिकृततेचे स्वरूप, अग्निसुरक्षा स्थिती, पूर्वीची व कारवाईदरम्यानची छायाचित्रे आणि केलेली नोटीस/सीलिंगची कारवाई याचा अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

आमगांव रायपूर जंगलात अस्वलीचा हल्ला; इसम गंभीर जखमी



वनविभाग कडून तात्काळ मदतीची हाक या पूर्वी ही या गावातील एका इसमाचा वाघाच्या हल्यात झाला होता मृत्यु

सेलू. / प्रशांत झाडे

अमगाव जंगल परिसरात मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास एका इसमावर अस्वलीने हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात रमेशराव डोळे हे गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रमेशराव डोळे हे आमगांव जंगल परिसरात असताना अस्वलीने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. हल्ल्यात त्यांच्या शरीरावर तसेच डोक्याच्या भागावर गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर त्यांना तातडीने उपचारासाठी कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने या परिसरात गस्त वाढवून नागरिकांना जंगल परिसरात सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करावे, अशी मागणी होत आहे.

उमंग गीताई कॉलेजमध्ये बी, एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींसाठी भव्य ओरिएंटेशन कार्यक्रम उत्साहात संपन्न

कोराडी /दिलीप वेवले

उमंग गीताई कॉलेज ऑफ बुमेन्स एज्युकेशन, नागपूर येथेबी.एस्सी. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींसाठी नुकताच एक भव्य, प्रेरणादायी व मार्गदर्शनपर ओरिएंटेशन कार्यक्रम उत्साहात पार पडला. नव्याने महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थिनींना महाविद्यालयाची शैक्षणिक कार्यपद्धती, विविध विभाग, अभ्यासक्रम तसेच भविष्यातील करिअरच्या संधी यांची माहिती करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाला उमंग कला निकेतन सोसायटीचे संचालक भरत फुले, उमंग गीताई कॉलेज ऑफ बुमेन्स एज्युकेशनच्या संचालिका वैशाली फुले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश वासनिक उपस्थित होते. मान्यवरांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये नवचैतन्य व आत्मविश्वास निर्माण झाला. कार्यक्रमाला संबोधित करताना भरत फुले यांनी विद्यार्थिनींचे स्वागत करून महाविद्यालयीन जीवन हे भविष्यातील यशाची भक्कम पायाभरणी करण्याचे महत्त्वाचे पर्व असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थिनींनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता आपल्या ज्ञानाचा, कौशल्यांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करावा, असे आवाहन केले. बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून उपलब्ध होणाऱ्या विविध संधींचा लाभ घ्यावा तसेच स्वतःसाठी निश्चित ध्येय ठरवून ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थिनींना दिला.

वैशाली फुले यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्रत्येक विद्यार्थिनीमध्ये एक वेगळी प्रतिभा दडलेली असते आणि योग्य संधी व मार्गदर्शन मिळाल्यास ती निश्चितच उजळून निघते, असे



सांगितले. शिक्षणासोबतच शिस्त, संस्कार, आत्मनिर्भरता, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास या गुणांचा विकास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. महाविद्यालय हे केवळ पदवी मिळविण्याचे ठिकाण नसून विद्यार्थिनींच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे व्यासपीठ आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थिनींनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. दुर्गेश वासनिक यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून सर्व नवप्रवेशित विद्यार्थिनींचे स्वागत केले. बी.एस्सी. प्रथम वर्ष हा विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असून याच काळात अभ्यासाची योग्य पद्धत, वेळेचे नियोजन आणि शिस्त अंगीकारणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून व्यावहारिक ज्ञान, तांत्रिक कौशल्य, संवादकौशल्य आणि आत्मविश्वास यांचीही तितकीच आवश्यकता आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थिनींनी आपल्या आवडी व क्षमतेनुसार करिअरचे ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुखांनी आपल्या-आपल्या विभागाचा शिक्षण, संशोधन, उद्योग, व्यवसाय तसेच रोजगाराच्या उपलब्ध संधींबाबत विभागप्रमुखांनी मार्गदर्शन केले. या माहितीमुळे विद्यार्थिनींना आपल्या आवडीच्या क्षेत्राची निवड करण्यास तसेच भविष्यातील करिअरचे नियोजन करण्यास निश्चितच मदत झाली.

संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी व आकर्षक सूत्रसंचालन सा.प्रा अनिशा इरशिद यांनी केले. आपल्या उत्कृष्ट वक्तृत्वशैलीने, आत्मविश्वासपूर्ण निवेदनाने आणि उत्साहपूर्ण सूत्रसंचालनाने त्यांनी संपूर्ण कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले. त्यांच्या दमदार सूत्रसंचालनाने कार्यक्रमात विशेष रंगत आली आणि त्यांनी आपल्या निवेदनातून अक्षरशः समां बांधला.नवीन शैक्षणिक प्रवासाची सकारात्मक सुरुवात, प्रेरणादायी मार्गदर्शन आणि उज्ज्वल भविष्याची नवी उमेद घेऊन बी.एस्सी. प्रथम वर्षाचा हा ओरिएंटेशन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमात महाविद्यालयातील डॉ. मृण्मयी जोगळेकर सा.प्रा. अश्विन अंजीकर, प्रा. प्रीती मानकर, सा.प्रा प्राची रेंगारी, सा.प्रा डॉ. वर्षा धुर्डे, सा.प्रा पुनम सोनवने, सा.प्रा. सृष्टी नाकाडे, सा.प्रा. सायली मेश्राम, सा.प्रा, साक्षी जैस, , सा.प्रा शिल्पा कावळे, सा.प्रा, पल्लवी गुरुहाने पवन करमेले, निलेश मेश्राम, गौरव गावंडे, कु. समीक्षा खोब्रागडे, कु. पायल ठाकूर कु. साक्षी जगताप, श्रीमती प्राची टेम्भरे व श्रीमती कीर्ती भोरकर व मधुकर डांगे प्रामुख्याने उपस्थित होते.

सविस्तर परिचय करून दिला. संबंधित अभ्यासक्रम, विषय, शैक्षणिक उपक्रम, प्रात्यक्षिक प्रशिक्षण तसेच त्या-त्या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी व भविष्यातील स्कोप याबाबत विद्यार्थिनींना सविस्तर माहिती देण्यात आली. विविध क्षेत्रांमध्ये उत्तम संधी उपलब्ध असून त्यासाठी योग्य दिशा व मार्गदर्शन कसे मिळवावे, याबाबत प्राध्यापकांनी मौलिक मार्गदर्शन केले.

कोराडी विद्युतविहार वसाहतीत 'जागतिक आदिवासी दिन' उत्साहात साजरा



गुणवंत विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार; विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

कोराडी /दिलीप वेवले

कोराडी औष्णिक वीज केंद्राच्या विद्युत वसाहतीमध्ये 'जागतिक आदिवासी दिन' मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. आदिवासी समाज सेवा समिती आणि राणी दुर्गावती आदिवासी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अग्रदूत हनुमान मंदिर, विद्युत वसाहत येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन कोराडी वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता शैलेंद्र कासुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलेश वरकड़े होते. प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ व्यवस्थापक प्रविण आत्राम, अमृत मरसकोल्हे, महादुला नगरपंचायतीचे नगरसेवक राज उईके, गोपालसिंग नैकाने, स्वाती पटले आणि संध्या साबळे प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थी, सेवापूर्ती कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिकांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. तसेच ३२५ होतकरू आदिवासी विद्यार्थ्यांना नोटबुकचे वाटप करण्यात आले.

जागतिक आदिवासी दिनानिमित्त लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा तसेच विविध पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना उपस्थित नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांचे कौतुक केले.

यावेळी मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवरांनी आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, थोर महापुरुषांचे योगदान आणि समृद्ध आदिवासी संस्कृती याबाबत विचार व्यक्त केले. तसेच आदिवासी समाजातील युवकांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीच्या प्रवाहात पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे पदाधिकारी सुभाष घासले यांनी केले. सूत्रसंचालन मिथुन कोडापे यांनी केले, तर आभार गोविंद पट्टे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समितीचे पदाधिकारी महादेव आडे, कैलाश उईके, रविंद्र आत्राम, विजेंद्र मडावी तसेच राणी दुर्गावती आदिवासी महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी आणि समाजबांधवांनी मोलाचे सहकार्य केले.

या कार्यक्रमाला विद्युत वसाहतीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


रामकृष्ण वाघ महाविद्यालयातील आर्यन खोब्रागडेने सुवर्णपदक जिंकले

कराटे स्पर्धेत आर्यन खोब्रागडेचा पराक्रम सुवर्णपदकावर नाव कोरले

कोराडी /दिलीप वेवले

नवी दिल्ली येथे अखिल भारतीय स्वातंत्र्य चषक राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा पार पडली त्या स्पर्धेमध्ये आर्यन खोब्रागडे याने कराटे स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.अत्यंत चुरशीच्या वरिष्ठ पुरुष कुमिते ६० किलो गटात स्पर्धा करताना रामकृष्ण वाघ विद्यालयातील आर्यन खोब्रागडेने अपराजीतत्व कौशल्य, वेग, आत्मविश्वास आणि झुंजार वृत्तीचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले.

७ ऑगस्ट रोजी आयोजित चॅम्पियनशिपमध्ये देशभरातील प्रतिभावान कराटे पटू एकत्र आले होते. त्यामुळे आर्यनची कामगिरी राष्ट्रीय स्तरावर महत्वपूर्ण टप्पा ठरली.आर्यनची सुवर्णपदक विजेती कामगिरी स्पर्धात्मक कराट्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्याची त्याची निष्ठा ,शिस्त सातत्यपूर्ण परिश्रम आणि दृढ निश्चय दर्शविते. भारतातील एक प्रमुख राष्ट्रीय स्तरावरील कराटे चॅम्पियनशिपमधील हा एक अभिमानाचा क्षण आहे. त्याच्या या यशामागे क्रीडा शिक्षक उमेश देशमुख व विद्या गजभिये यांचे मार्गदर्शन लाभले.त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. मारोती वाघ, संस्थेचया संचालिका प्राचार्या डॉ. लता वाघ, प्रभारी प्राचार्य प्रा. पंकज झगडे, सर्व शाखा विभाग प्रमुख प्रा. दीपक ठाकरे, वाणिज्य व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. किरण पांडे, बीबीए विभाग प्रमुख प्रा. स्वाती इंगळे यांनी कौतुक करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



पीसीआय-एसकेबी तर्फे एआय व तंत्रज्ञानावर एकदिवसीय एफडीपी

नागपूर / दिलीप वेवले

श्रीमती किशोरीताई भोयर कॉलेज ऑफ फार्मसी, कामठी यांच्या वतीने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (इण्ड), नवी दिल्ली यांच्या सहकार्याने 'ई २०२० नुसार' ई.डी. एज्युकेशन (२०२६) ची प्रभावी अंमलबजावणी' या विषयावर एकदिवसीय ई.म्ल्यू अनत्दज्हू ईर्दुंएस (इअइ) आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विदर्भातील ५५ फार्मसी महाविद्यालयांमधील शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



कार्यक्रमाचे मुख्य अतिथी इण्ड चे उपाध्यक्ष जशुभाई एच. चौधरी होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी फार्मसी शिक्षण, फार्मसी व्यवसाय तसेच फार्मसी शिक्षकांच्या विकासासाठी इण्ड करीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले की, शिक्षक हे विद्यार्थ्यांचे रोल मॉडेल असतात आणि भविष्यातील सक्षम फार्मसी व्यावसायिक घडविण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकांची आहे. त्यामुळे बदलत्या काळानुसार शिक्षकांनी आपले ज्ञान, कौशल्ये आणि तंत्रज्ञानातील अद्ययावत माहिती सातत्याने विकसित करणे आवश्यक आहे. जशुभाई चौधरी यांनी अल्प कालावधीच्या सूचनेवर कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन करून तो यशस्वी केल्याबद्दल एसकेबी कॉलेजच्या संपूर्ण टीमचे विशेष कौतुक केले.

त्यांनी प्राचार्य प्रा. मिलिंद जे. उमेकर, डॉ. नेहा राऊत तसेच संपूर्ण शिक्षकेतर व शिक्षण कर्मचाऱ्यांच्या समर्पित प्रयत्नांचे आणि उत्कृष्ट समन्वयाचे अभिनंदन केले.

इअइ मधील तांत्रिक सत्रांमध्ये इण्ड चे तज्ज्ञ व केंद्रीय परिषद सदस्यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सारथ चंद्रन सी. आणि डॉ. संजय तोषनिवाल, केंद्रीय परिषद सदस्य, इण्डयांनी 'ई २०२० नुसार' ई.डी. एज्युकेशन (२०२६) चा आढावा' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. आकाश मराठकम, इण्ड चे वक्ते, यांनी 'ई, ल्म्ल्दस्ने् ल्ल्ंदह व त्याची अंमलबजावणी, तसेच फार्मसी अभ्यासक्रमात ल्ल्ंदह छ्हात्त्ल्ुहम (ई) चे एकत्रीकरण या विषयांवर मार्गदर्शन केले. प्रत्येक सत्नांतर प्रश्नोत्तर व संवादात्मक चर्चेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रा. मिलिंद जे. उमेकर, प्राचार्य, एचॅण्ड्ह व राष्ट्रीय अध्यक्ष, "इअइ यांनी इण्ड च्या या शिक्षकाभिमुख उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले की, या इअइ मुळे शिक्षकांना नवीन ई.डी. अभ्यासक्रम, त्यातील ई, तंत्रज्ञान आणि आधुनिक अध्यापन पद्धतींशी परिचित होण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळाली आहे. बदलत्या फार्मसी शिक्षणाच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रा. उमेकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. नेहा राऊत आणि एचॅण्ड्ह्च्या संपूर्ण शिक्षण कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. त्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे, टीमवर्क आणि उत्कृष्ट नियोजनामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सहभागी सर्व शिक्षकांचे सक्रिय सहभागाबद्दल आभार मानले.

कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. दिनेश एम. विंयाणी यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी अभिप्राय, समारोप समारंभ आणि सहभागी शिक्षकांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

फार्मसी शिक्षकांना सक्षम करणे, नवीन अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि ई व आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भविष्यातील सक्षम फार्मसी व्यावसायिक घडविण्याच्या दिशेने हा इअइ महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.

वर्षावासाच्या मंगल प्रारंभाला भीम- बुद्ध गीतांची साथ; धानोलीत धम्म, समता अन् प्रबोधनाचा जागर

सेलू / प्रशांत झाडे

धानोली मेघे : वर्षावास प्रारंभानिमित्त भीमाई बुद्ध विहार, धानोली यांच्या वतीने भीम-बुद्ध गीतांचा व प्रबोधनात्मक भजनांचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पंचशील भजन मंडळ, धानोली यांच्या उपस्थितीत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच तथागत भगवान बुद्ध व महामानवांना अभिवादन करून धम्ममय वातावरणात कार्यक्रमास प्रारंभ झाला.कार्यक्रमात हार्मोनियम वादक प्रवीण भगत, प्रबोधन गायक प्रतिभा भगत, तबला वादक गजानन तेरेगे तसेच दिलीप कुंभलवार, दशरंशकर भगत, तुळशीदास भगत, मंजुषा भगत, सुहानी भगत, रेखा कांबळे, नम्रता खडसे, अनीता पोहरे, संजना भगत आणि प्रशील रामटेके यांनी भीम-बुद्ध गीत व प्रबोधनात्मक भजने सादर केली.

‘विकसित भारत युथ कॉन्क्लेव्ह- २०२६’ युवकांना एकत्र आणणारा दुवा ठरेल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वर्षा निवासस्थानी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाची बैठक



मुंबई : महाराष्ट्रातील तसेच देशभरातील युवकांना क्रीडा, नवोन्मेष, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सांस्कृतिक क्षेत्रातील संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुण्यात ‘विकसित भारत युथ कॉन्क्लेव्ह-२०२६’ या तीन दिवसीय भव्य युवा महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. देशभरातील युवकांना एकत्र आणणारा हा दुवा ठरेल, असाविश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज वर्षा निवासस्थानी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाची बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त दीपक सिंगला तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

तीन दिवसांच्या महोत्सवात सुमारे एक हजार प्रतिनिधींचा सहभाग

पुण्यातील श्री शिवछत्रपती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे आयोजित करण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय स्तरावरील युवा संमेलनात देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधून युवकांचा सहभाग राहणार आहे. प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेशातून सुमारे ३० ते ३५ प्रतिनिधी सहभागी होण्याचे नियोजन असून एकूण सुमारे एक हजार प्रतिनिधी सहभागी होतील. यामध्ये महाराष्ट्राचे ३०० प्रतिनिधी, तर इतर राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधून ७०० प्रतिनिधी सहभागी होतील. तीन दिवसांच्या या महोत्सवाला राज्यभरातील एक लाखांहून अधिक युवकांचा फूटफॉल असण्यासाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केल्या.

विकसित भारत युथ कॉन्क्लेव्ह-२०२६ हा भारताच्या युवा शक्तीला क्रीडा, नवोन्मेष आणि संस्कृतीच्या माध्यमातून एकत्र आणणारा राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम म्हणून प्रस्तावित आहे. यातून युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे, नवोन्मेष व उद्योजकतेला चालना देणे, देशाची सांस्कृतिक विविधता साजरी करणे, आरोग्यपूर्ण जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या युवा संमेलनाची संकल्पना ‘वॉरिअर, फ्यचुर आणि कल्चरल असा तीन अनुभव क्षेत्रांमध्ये करण्यात यावी. या तीनही क्षेत्रांमधून युवकांना क्रीडा, तंत्रज्ञान, नवोन्मेष, उद्योजकता, संस्कृती आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली. यापैकी वॉरिअर झोनमध्ये युवकांमध्ये साम्यर्थ, शिस्त आणि धैर्य विकसित करण्यावर भर देण्यात यावा. स्वसंरक्षण कार्यशाळा, क्रीडा विज्ञान, पोषण, क्रीडा मानसशास्त्र यासह विविध क्रीडा उपक्रम आयोजित करावा. आर्मी ऑब्स्टॅकल कोर्स, वॉल क्लायम्बिंग, रिॲक्शन टाइम अरेना आणि फिटनेस असे अनुभवाधारित उपक्रमही यात असावेत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पुणे हे तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाचे महत्त्वाचे केंद्र असल्याने ‘फ्यचुर झोन’मध्ये युवकांच्या तंत्रज्ञानविषयक क्षमतांना प्रोत्साहन देण्याच्या मुख्यमंत्र्यांनी सूचना करत ‘कल्चरल झोन’मध्ये सर्जनशीलता, आरोग्यपूर्ण जीवनशैली आणि महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा यांचा संगम घडावे. महाराष्ट्रातील लोककला, लोकसंगीत, लोकनृत्य, चित्रकला, छायाचित्रण आदी कलाप्रकारांसाठी स्पर्धा आणि उपक्रम आयोजित करावे. त्याचबरोबर, योग, ध्यान, मानसिक आरोग्य, श्वसनाचे व्यायाम यांसारख्या उपक्रमांसोबतच स्थानिक हस्तकला, वारली व पैठणी कला, पारंपरिक महाराष्ट्रीय खाद्यसंस्कृती आणि शाश्वत जीवनशैली यांचीही माहिती युवकांना करून देण्यात यावी, असे निर्देश दिले. या महोत्सवासाठी पूर्णपणे डिजिटल नोंदणी विकसित करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या.

ऑनलाइन नोंदणी, राज्यनिहाय नामनिर्देशन, कागदपत्र पडताळणी, क्यूआर कोड आधारित डिजिटल ओळखपत्र, मोबाईल कार्यक्रम मार्गदर्शक आणि थेट सूचना अशी डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. त्यामुळे सहभागी युवकांची नोंदणी, प्रवेश आणि विविध उपक्रमांतील सहभाग याचे प्रभावी व्यवस्थापन करता येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

क्रीडा क्षेत्रात खासगी सहभाग वाढविण्यावर भर

‘खेलो इंडिया’ अंतर्गत केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार असल्याने महाराष्ट्राने केंद्राच्या योजनांमध्ये प्रभावी सहभाग घेण्याबरोबरच क्रीडा क्षेत्रात खासगी क्षेत्राची गुंतवणूक आणि सार्वजनिक खाजगी भागीदारीवर भर देण्याबरोबर क्रीडा पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्रातील क्रीडा फाउंडेशनशी समन्वय साधण्याबाबत चर्चा करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या. महाराष्ट्राला आगामी दशकात क्रीडा क्षेत्रात आघाडीवर नेण्यासाठी शासकीय प्रयत्नांसोबतच खासगी क्षेत्राची भागीदारी आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सोलर रूफटॉप योजनेची पात्र यादी १५ ऑगस्टला ग्रामपंचायतीत; कारंजा महावितरण विभागाची माहिता



कारंजा घाडगे: वाढत्या वीज बिलातून सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दिलासा देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या ‘स्मार्ट योजना’ - संपूर्ण निवासी रूफटॉप सोलर (SMART - Sampoorna Aawasi Rooftop Solar) अंतर्गत १ किलोवॉट सोलर रूफटॉप सिस्टींमवर भरघोस अनुदान दिले जात आहे. या योजनेत दारिद्र्य रेषेखालील तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील घरगुती वीज ग्राहकांसाठी विशेष सवलत लागू करण्यात आली आहे. कारंजा उपविभागाअंतर्गत एकूण १०,५९० ग्राहक या योजनेसाठी पात्र ठरले आहेत.

?विशेष म्हणजे, या योजनेअंतर्गत ज्या ग्राहकांची नावे समाविष्ट आहेत, त्यांची पात्र यादी आगामी १५ ऑगस्ट रोजी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती महावितरणकडून देण्यात आली आहे. कारंजा महावितरण विभागाचे उपविभागीय अभियंता आकाश राजूरकर यांनी परिसरातील जास्तीत जास्त पात्र ग्राहकांनी या योजनेचा तातडीने लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

सामान्यतः १ किलोवॉट सोलर सिस्टीम बसवण्यासाठी सुमारे ५० हजार रुपयांचा खर्च येतो. मात्र, या विशेष योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना ९५ टक्के अनुदान मिळत असून त्यांना फक्त २५०० रुपये भरावे लागणार आहेत. तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ग्राहकांना ९० टक्के अनुदान दिले जात असून त्यांना केवळ ५००० रुपयांचा भरणा करावा लागेल. दरमहा १०० युनिटपेक्षा कमी वीज वापर असलेल्या इतर ग्राहकांना ८० टक्के अनुदान मिळणार असूनत्यांना सुमारे १० हजार रुपये खर्च येईल.

?१ किलोवॉट क्षमतेच्या सोलर पॅनेलद्वारे दरमहा सरासरी १२० युनिट वीज तयार होते. त्यामुळे १०० युनिटपर्यंत वीज वापर असणाऱ्या कुटुंबाचे महिन्याचे वीज बिल जवळपास शून्य होणार असून, दरवर्षी सुमारे ७ ते १० हजार रुपयांची थेट बचत होणार आहे. याशिवाय बसवलेल्या सोलर सिस्टींमची सुरुवातीची ५ वर्षे मोफत देखभाल व दुरुस्ती अधिकृत कंपनीकडून केली जाणार आहे.

?या योजनेचा लाभ घेण्यासाठी महावितरणचे घरगुती वीज ग्राहक असणे आवश्यक आहे. अर्जासाठी आधार कार्ड, वीज बिल आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या ग्राहकांसाठी जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे. १५ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायतीत जाहीर होणाऱ्या यादीत आपले नाव तपासून कारंजा परिसरातील पात्र नागरिकांनी ज्रेड्डुद्दन्ह्य या अधिकृत पोर्टलवर, महावितरणच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज करावा किंवा महावितरण विभागाच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन उपविभागीय अभियंता आकाश राजूरकर यांनी केले आहे.

‘शिक्षणाशिवाय पर्याय नाही; मातंग समाजाने मुख्य प्रवाहात यावे’

मिरापूर येथे अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त खासदार अमर काळेंचे आवाहन



वर्धा : ‘शिक्षणाशिवाय पर्याय नाही. मातंग समाजाने पारंपरिक रूढी-परंपरा आणि व्यवसायाच्या चौकटीत न अडकता शिक्षणाच्या प्रवाहात यावे. इतर समाजांच्या खांद्याला खांदा लावून प्रगतीच्या मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे,’ असे आवाहन खासदार अमर काळे यांनी मिरापूर येथे केले.

अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मिरापूर येथे आयोजित कार्यक्रमाला खासदार अमर काळे यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करून अभिवादन केले.


कार्यक्रमात बोलताना खासदार काळे यांनी मातंग समाजाच्या शैक्षणिक प्रगतीचा मुद्दा प्रभावीपणे मांडला. ‘समाजाच्या प्रगतीचा पाया शिक्षण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात मोठे साधन मानले. समाजानेही शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन नव्या पिढीला उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, असे खासदार काळे यांनी सांगितले.

‘परंपरागत व्यवसायापुरते मर्यादित न राहता आधुनिक शिक्षण, कौशल्य आणि स्पर्धेच्या माध्यमातून नव्या संधी शोधा. समाजातील प्रत्येक कुटुंबाने आपल्या मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले, तर पुढील पिढी निश्चितच मोठ्या पदांवर पोहोचेल,’ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी अजय डोंगरे, दिनेश राऊत, सुनील तळवेकर, बाबाराव निवल, राहुल सुरकार, प्रतिभा गावंडे, यशवंत झाडे, नागो सातकर, पुरुषोत्तम उगडे, जानूराम भोयर, श्यामा ठाकरे, नाना तोडासे, सुनील सातपुते, महेश महल्ले, संकेत गावंडे, प्फुल्ल देशमुख, अनिकेत राऊत यांच्यासह मिरापूर येथील मातंग समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोठ्याला आग, कर्जाच्या चिंतेत शेतकऱ्याची आत्महत्या

खासदार अमर काळेंची राऊत कुटुंबीयांना भेट शासकीय मदत तातडीने देण्याचे प्रशासनाला निर्देश



वर्धा : तालुक्यातील नेरी येथील शेतकरी बंडूजी राऊत यांनी शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. काही दिवसांपूर्वी राऊत यांच्या गोठ्याला आग लागून गाय-बैल भाजल्याची घटना घडली होती. या घटनेत मोठे नुकसान झाले नसले तरी त्यांच्यावर असलेले बँकेचे कर्ज आणि झालेल्या नुकसानीच्या चिंतेने ते मानसिकदृष्ट्या व्यथित होते. त्यातूनच त्यांनी ९ ऑगस्ट २०२६ रोजी टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येते. या घटनेची माहिती मिळताच खासदार अमर काळे यांनी बंडूजी राऊत यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. पत्नी, दोन मुले, नातवंडे असा मोठा परिवार मागे सोडून गेलेल्या राऊत यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचे खासदार काळे यांनी सांगितले.

शेतकरी कुटुंबावर अचानक आलेल्या या संकटाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियमानुसार पात्र असलेली सर्व मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, तसेच संबंधित यंत्रणांनी या प्रकरणात संवेदनशीलतेने कार्यवाही करावी, असे निर्देश खासदार अमर काळे यांनी प्रशासनाला दिले.

शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी, कर्जबाजारीपणा आणि नैसर्गिक अथवा आकस्मिक संकटांमुळे कुटुंबांवर येणारे संकट गांभीरपणे घेण्याची गरज असल्याचेही यावेळी व्यक्त करण्यात आले.

राऊत कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्यासाठी आवश्यक ती शासकीय मदत मिळवून देण्यासाठी आपण पाठपुरावा करू, अशी ग्वाही खासदार अमर काळे यांनी यावेळी दिली. यावेळी अजय डोंगरे, दिनेश राऊत, सुनील तळवेकर, बाबाराव निवल, राहुल सुरकार, प्रतिभा गावंडे, यशवंत झाडे, नागो सातकर, पुरुषोत्तम उगडे, जानूराम भोयर, श्यामा ठाकरे, नाना तोडासे, सुनील सातपुते, महेश महल्ले, संकेत गावंडे, प्फुल्ल देशमुख, अनिकेत राऊत यांच्यासह मिरापूर येथील मातंग समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गायमुख–खापरी रस्त्याची दुरवस्था; शासनाचे दुर्लक्ष, विद्यार्थ्यांना गाडी ढकलण्याची वेळ



सेलू / प्रशांत झाडे

गायमुख ते खापरी या मार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांसह शाळकरी विद्यार्थ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाल्याने वाहनांना वारंवार अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे.

गाडी रस्त्यात बंद पडल्यास शाळेतील विद्यार्थ्यांनाच गाडीला धक्का मारण्याची वेळ येत असल्याचे चित्र समोर आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गायमुख–खापरी मार्गाची तातडीने पाहणी करून रस्त्यावरील खड्डे बुजवावेत तसेच रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी परिसरातील नागरिक व पालकांकडून होत आहे. शासन व संबंधित विभागाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

राज्यातील १० नगर पंचायती आणि परिषदांच्या विकास आराखड्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मंजुरी

शहरी विकासाला चालना; गेल्या दीड वर्षात १०० हून अधिक शहरांच्या विकास आराखड्यांना मान्यता



मुंबई : राज्यातील शहरी भागांचा सुनियोजित विकास व्हावा, वासाठी राज्य शासनाने विशेष पावले उचलली आहेत. याच अनुषंगाने उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील विविध १० नगरपंचायती, नगरपरिषदांच्या विकास आराखड्यांना मंजुरी दिली आहे. यामुळे यांच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या वर्ष दीड वर्षात राज्य शासनाने सुमारे १०० पेक्षा अधिक शहरांच्या विकास योजनांना मान्यता दिली आहे. पाणीपुरवठा, सांडपाणी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मंजूर केलेल्या विकास आराखड्यांमध्ये जिवती (चंद्रपूर), शिरूर अनंतपाळ, रेणापूर (लातूर), सोयगाव (छत्रपती संभाजीनगर), पालम (परभणी), उमरखेड (यवतमाळ), बीड, कोरपना, गडचांदूर (चंद्रपूर) आणि पुलगाव (वर्धा) यांचा समावेश आहे.

गेल्या काही वर्षांत राज्यातील नागरी सुविधा सुधारण्यासह आणि शहरीकरणाला शिस्तबद्ध रूप देण्यावर भर देण्यात येत आहे. या अंतर्गत विकास आराखड्यांना मंजुरी दिली जात असून, शहरांचा नियोजनबद्ध विकास आणि पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण करणे हे उद्दिष्ट असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे. विकास आराखडे मंजूर झाल्यामुळे रस्ते, बगीचा, क्रीडांगण, ग्रंथालय, दुकाने, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन सार्वजनिक सुविधांसाठी जागा आरक्षित करून त्यांचा नियोजित विकास करणे शक्य होणार असून शाळा, रुग्णालये आणि उद्याने यांसारख्या सामाजिक सुविधांसाठी योग्य जागा उपलब्ध होऊन नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध त्याद्वारे होण्यास मदत होणार आहे.

प्रस्थापितांच्या पोटशूळावर विकासाची मात: आमदार सुमित वानखेडे यांची ध्येयवादी वाटचाल



आर्वी: आजच्या धावपळीच्या आणि केवळ प्रसिद्धीभोवती फिरणाऱ्या राजकारणात ‘कामाचा माणूस’ ओळखणे कठीण झाले आहे. परंतु आर्वी मतदारसंघाचे आमदार सुमित वानखेडे यांनी आपल्या शांत, संयमी आणि केवळ विकासकामांना समर्पित वृत्तीने एक नवा वस्तूपाठ घालून दिला आहे. राजकीय वारसा नसताना केवळ स्वकर्तृत्वावर पहिल्या पिढीचे नेतृत्व म्हणून पुढे आलेल्या वानखेडे यांनी राजकीय कुरघोड्या, वैयक्तिक टीका आणि श्रेयाची पळवापळव या सगळ्यापलीकडे जाऊन मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासालाच आपले सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

भूतकाळात ज्या भागातील कामे वर्षानुवर्षे तुंबून राहिली होती, ती अडकलेली कामे आता वेगाने मार्गी लागत आहेत. आमदार सुमित वानखेडे यांच्या कामाची प्रचंड गती, स्पष्ट दिशा आणि स्थानिक तरुणांसाठी रोजगारपूरक प्रकल्प उभारणीची दूरदृष्टी पाहून प्रस्थापितांचे धाबे दणाणले आहेत. भूतकाळात जे स्वतः रोजगारपूरक कामे करू शकले नाहीत, त्यांना आता होत असलेल्या विकासकामांमुळे पोटशूळ उठला आहे. या अस्वस्थतेतूनच आमदार सुमित वानखेडे यांना बनावट सुर्वांच्या आधारे बदनाम करण्याचे आणि त्यांच्या प्रतिमेला डाग लावण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

राजकारणात वैयक्तिक टीका, अपशब्द किंवा विरोधाचे प्रसंग आले की लगेच अश्रू ढाळून सहानुभूतीचा ‘रडीचा डाव’ खेळण्याचा मार्ग अनेकदा निवडणारे प्रामाणिक कर्तव्यदक्ष आमदार सुमित वानखेडे यांना मुद्दामच त्रास होईल असे एकंदरीत काहींनी ठरवलेले आहे. यात एक कुटुंब व त्याचे नातलग सगेसोयरे या व्यतिरिक्त इतर कोणी दिसत नाही. सुमित वानखेडे यांना अशा प्रकाराचा सहानुभूतीचा ‘रडीचा डाव’ खेळता येत नाही. त्यांना जमते ते संयम बाळगत प्रत्यक्ष मैदानात उतरून कामाच्या माध्यमातून उत्तरे देणे. राजकीय विरोधकांचे खुले आव्हान पेलणे सोपे असते; परंतु काही पक्षांतर्गत विरोधकांकडूनच क्षुल्लक बाबींवरून अंतर्गत कुरघोडीचे राजकारण सुरू आहे. या प्रकारामुळे विरोधकांच्या हातात आयते कोलीत मिळते याचे भान न ठेवता स्वकीयांकडूनच होणारे हे प्रयत्न खेदजनक आहेत. तरीही अशा कोणत्याही अडथळ्यांना बळी न पडता, स्वतःच्या मान-सन्मानापेक्षा मतदारसंघातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजना, रस्ते, पाणी आणि रोजगार पोहोचवणे हेच त्यांनी आपले ध्येय मानले आहे.

पद आणि सत्ता ही क्षणभंगुर असते, परंतु कठीण काळातही आपली निष्ठा न बदलता आणि रडण्याऐवजी लढून जनतेची सेवा करणारा नेताच लोकांच्या मनात घर करतो. विरोधकांच्या बदनामीच्या कारस्थानांना न जुमानता आणि टीकेचे उत्तर प्रत्यक्ष कामाच्या गुणवत्तेने देणाऱ्या आमदार सुमित वानखेडे यांच्या या निष्ठावंत आणि अभ्यासू कार्यशैलीची चर्चा आज संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या आदराने केली जात आहे.